# रुकडी रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल: २०१९

ज्ञानदेव तळुले
विजय ककडे
महादेव देशमुख

**अर्थशास्त्र अधिविभाग**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४

**ऑगस्ट २०१९**

प्रा. (डॉ.) देवानंद बी. शिंदे
एम.एस्सी., पीएच्.डी.
कुलगुरू
Prof. (Dr.) Devanand B. Shinde
M.Sc.,Ph.D.
Vice-Chancellor

Estd :1962
NAAC 'A' Grade
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी : कार्यालय – (०२३१) २६०९०६०
निवास – (०२३१) २६०९०५३
फॅक्स : ००९१-२३१-२६९१५३३
Tel. : Office - (0231) 2609060
Resi. - (0231) 2609053
Fax : 0091-231-2691533
E-mail : vcoffice@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाचा समावेश शासनाच्या विविध कल्याणकारी व आर्थिक योजनांचे मूल्यांकन करणारी संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आपल्या नामिकेत समाविष्ट केला ही आनंदाची व अभिमानाची तसेच जबाबदारीची बाब ठरते. या कामी अर्थशास्त्र विभागाने अथक परिश्रम घेऊन प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार केला आहे. शासन सामाजिक व आर्थिक विकासासाठी जे विविध प्रकल्प राबविते त्यातून काही लाभार्थी घटक व काही त्याचा भार सहन करणारे प्रकल्पग्रस्त होतात. ज्यांना लाभ होतो त्यांनी ज्यांचे नुकसान होते त्यांना पुरेशी नुकसान भरपाई दिली तर सामाजिक कल्याणात वाढ होते. रूकडी–चिंचवाड दरम्यान मोठा पूल बांधणे व जोडरस्त्यासाठी भूसंपादन करणे या प्रकल्पाबाबत अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक व प्रकल्प समन्वयक विजय ककडे, सहसमन्वयक ज्ञानदेव तळुले व एम.एस. देशमुख यांनी तयार केलेला असून हा अहवाल शासनास धोरण निश्चितीसाठी महत्वाचे साधन ठरते. शिवाजी विद्यापीठाचे असे सामाजिक योगदान उत्तरोत्तर वाढत जाईल याची मला खात्री वाटते व असे मुल्यांकनाचे कार्य सतत विस्तारत राहावे अशी शुभेच्छा व्यक्त करून संपूर्ण अभ्यासगटाचे अभिनंदन करतो. शासनाने व्यक्त केलेला विश्वास ही महत्वाची जबाबदारी शिवाजी विद्यापीठ पूर्ण क्षमतेने पार पाडेल याची खात्री वाटते.

(देवानंद शिंदे)
कुलगुरू

31 AUG 2019

# शासनाच्या योजनांच्या मूल्यमापनासाठी सल्लागार समिती

| अ. क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | **प्रा. डॉ. देवानंद शिंदे**, मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | अध्यक्ष |
| 2 | **डॉ. विलास डी. नांदवडेकर**, मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सचिव |
| 3 | **प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे**, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | मुख्य समन्वयक |
| 4 | **प्रा. डॉ. एम. एस. देशमुख**, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सह. समन्वयक |
| 5 | **डॉ. जी. एस. कुलकर्णी**, उपकुलसचिव, अभियांत्रिकी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सह. समन्वयक |
| 6 | **श्री. ए. बी. चौगुले**, वित व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | वित्त सल्लागार |

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| कार्यकारी सारांश (Executive Summary) | |
| प्राक्कथन | |
| औपचारिक वास्तव | |
| परिणामे | |
| सारांशात | |
| प्रकरण: १ | रस्ते, महामार्ग, पायाभूत सुविधा व भूसंपादन विषयक विवेचन |
| १.१ | महामार्ग प्रकल्प कामी प्रसंगी अतिरिक्त जमीन अधिग्रहण |
| १.२ | सरकारकरीता धडा |
| १.३ | न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने |
| प्रकरण: २ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाची पार्श्वभूमी |
| २.१ | प्रकल्पाची माहिती |
| २.२ | रूकडी गावच्या पुलाचा नकाशा |
| २.३ | प्रकल्पाच्या सद्यस्थितीची विविध छायाचित्रे |
| २.४ | रूकडी गावचा प्रकल्प तपशील |
| २.५ | उपशमन मूल्यमापन (Mitigation Measures) |
| २.५.१ | २.५.१ विविध संभाव्य सामाजिक परिणामांचे विश्लेषण आणि त्यांचे प्रस्तावित उपाय |
| २.६ | प्रकल्पाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम (Positive and Negative Impact of the Project) |
| २.६.१ | प्रकल्पाचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम |
| २.७ | गट नंबर नुसार माहिती |

| | |
|---|---|
| २.७.१ | रूकडी गाव बाधित लाभार्थी यादी |
| प्रकरण: ३ | माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती |
| प्रास्ताविक | |
| ३.१ | अभ्यासाची उद्दिष्टे |
| ३.२ | अभ्यास पद्धती |
| ३.३ | अभ्यासाची पूर्वपिठीका |
| ३.४ | सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती |
| ३.४.१ | सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया |
| ३.५ | सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे |
| ३.६ | प्रकल्प प्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी |
| ३.६.१ | बहुविध स्त्रोत माहिती संकलन |
| ३.६.२ | प्रकल्पबाधीत, प्रतिगामी – अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह |
| ३.६.३ | विशेष समूह चर्चा (Focused Group Discussions) |
| प्रकरण: ४ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांचा प्राथमिक अभ्यास व स्थलवास्तवाचे आकलन |
| पार्श्वभूमी | |
| तक्ता ४.१ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबांचे धार्मिक विवरण |
| तक्ता ४.२ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचा प्रकार |
| तक्ता ४.३ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबातील शैक्षणिक स्थिती |
| तक्ता ४.४ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबांचे व्यावसायिक वर्गीकरण |
| तक्ता ४.५ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचा सामाजिक व संस्थात्मक सहभाग |

| | |
|---|---|
| तक्ता ४.६ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे जमिन मालकीवरून विवरण |
| तक्ता ४.७ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे घर मालकी विवरण |
| तक्ता ४.८ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबांच्या मालकीच्या घराचे विवरण |
| तक्ता ४.९ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या मालकीच्या घराचे आकारमान |
| तक्ता ४.१० | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाकडील टिकावू उपभोग्य वस्तू व कृषी भांडवली वस्तूंची मालकी |
| तक्ता ४.११ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाकडील पशुधन मालकीचे विवरण |
| तक्ता ४.१२ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे पशुधन मालकीचे प्रकारानुसार विवरण |
| तक्ता ४.१३ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे कर्जविषयक विवरण |
| तक्ता ४.१४ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे कर्जस्त्रोतान्वये विवरण |
| तक्ता ४.१५ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबातील मुलांचे तांत्रिक शिक्षणानुसार विवरण |
| तक्ता ४.१६ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबातील शिक्षण सोडण्याचे प्रमाण |
| तक्ता ४.१७ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे हंगामात स्थलांतरीत मजुरीवरून विवरण |
| तक्ता ४.१८ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबातील महिला व पुरुषांचे हंगामी रोजगार स्थलांतर |
| तक्ता ४.१९ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या पिकपद्धतीविषयी विवरण |
| तक्ता ४.२० | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबांच्या कृषी पर्यायी रोजगारविषयक विवरण |
| तक्ता ४.२१ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांच्या जमिन बाधनविषयक विवरण |
| तक्ता ४.२२ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांवरील जमिन देण्याविषयीच्या सक्ती/दबावविषयक विवरण |

| | |
|---|---|
| तक्ता ४.२३ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांना प्रकल्पबाधन क्षेत्राच्या मोबदल्याविषयक विवरण |
| तक्ता ४.२४ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांच्याकडून प्रकल्पाविरोधाचे स्वरूप |
| तक्ता ४.२५ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांच्या प्रमुख मागण्या |
| तक्ता ४.२६ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांचे प्रकल्पाविषयीचे मत |
| तक्ता ४.२७ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांच्या उर्वरित जमिनीच्या अपेक्षित बाजारमूल्याविषयी प्रकल्पबाधीतांचा अंदाज |
| तक्ता ४.२८ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांचे प्रकल्पोपरांत रोजगारविषयक अंदाज |
| तक्ता ४.२९ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांचे प्रकल्पोपरांत शेती व्यवसायाविषयीचे व्यवसाय चालू ठेवण्याविषयीचे मत |
| तक्ता ४.३० | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांकडून शेती व्यवसाय बंद करण्याविषयीची कारणमिमांसा |
| तक्ता ४.३१ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्याचा प्रकल्पबाधीतांकडून शेतजमिन खरेदी करण्याविषयक विचार |
| तक्ता ४.३२ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत शेतजमिन खरेदी करण्याविषयीची कारणमिमांसा |
| तक्ता ४.३३ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत शेतजमिन खरेदी न करण्याविषयीची कारणमिमांसा |
| तक्ता ४.३४ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्यात अपेक्षित शेतजमिन खरेदीविषयक प्रकल्पबाधीतांचे अंदाज |
| तक्ता ४.३५ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांचे मत |
| तक्ता ४.३६ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पोपरांत प्रकल्पबाधीतांचे रोजगारविषयक अंदाज |
| तक्ता ४.३७ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाचे अपेक्षित परिणाम |
| तक्ता ४.३८ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पावरील रोजगार संधीविषयी प्रकल्पबाधीतांचे मत |

| | |
|---|---|
| प्रकरण: ५ | निष्कर्ष व शिफारशी |
| संदर्भसूची | |
| परिशिष्ट: १ | प्रकल्प सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास धरण प्रकल्प बाधीत कुटुंब प्रश्नावली |
| परिशिष्ट: २ | रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवालकामी सर्वेक्षीत प्रकल्प बाधीत कुटुंब यादी |

## कार्यकारी सारांश (Executive Summary):

**I) प्राक्कथन:**

कोल्हापूर जिल्ह्यातील तावडे हॉटेल राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ ते गांधीनगर नवे चिंचवाड रूकडी ते राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २०० ला जोडणारा रस्ता प्रजिमा क्रमांक २० कि.मी. रस्ता ता. करवीर व ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूरला जोडणारा नवीन रूकडी चिंचवाड दरम्यान मोठा पूल बांर्धी व जोडरस्त्यासाठी रस्ता रूंदीकरण होत असलेली जागा संपादन करण्यासाठी रूकडी गावच्या हद्दीत जमिन संपादन करणे आवश्यक आहे.

सदर योजनेमुळे शहरामधील वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणार नाही, त्याचा लाभ रूकडी गावामधील लोकांना होणार आहे. तसेच कोल्हापूर शहर वाहतूक शहरामध्ये न येता शहराच्या बाहेरून होईल. त्यामुळे त्यांना वाहतूक करण्यासाठी शहरामधील रहदारीशी संपर्क होणार नाही. त्यामुळे वाहतुकीचे नियंत्रण होईल. तसेच रूकडी शहराचा सुधारित विकास आराखडा शासनाने मंजूर केलेला आहे.

प्रस्तुत अहवालाच्या प्रकरण क्रमांक ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करवीर तालुक्यातील गांधीनगर-चिंचवाड गावांतून जाणारा राज्य महामार्ग क्रमांक २०० ला जोडणारा रस्ता व मुख्यत्वे मौजे रूकडी येथे पूल बांधकाम गेली काही वर्षे प्रलंबित आहे. त्यामुळे प्रकल्पव्ययात वृद्धी होवून एकूण खर्चातही वाढ झालेली आहे. प्रस्तुत प्रकल्प विलंबाचे महत्त्वाचे कारण म्हणजे भूमी अधिग्रहण व जमीन मोबदल्यासंबंधी निर्माण झालेली तेढ होय. याच प्रमुख समस्येचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तत प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास हाती घेतला असून प्रस्तुत अभ्यास मुख्यत्वे खाली नमूद केलेल्या उद्दिष्टपूर्तीवर निर्भर आहे.

- ➢ प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे.
- ➢ प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणामांची चिकित्सा करणे.

- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य संधी व व्यय तसेच त्याग या घटकांची चिकित्सा करणे.
- डिसेंबर २०१३ च्या भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास तसेच प्रकल्पबाधीतांच्या अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याविषयीची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीत जमिनीच्या बदल्यात जमीन देवू करणे शक्य आहे काय याविषयीची पडताळणी करणे.
- प्रकल्पबाधीतांवरील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिणाम अभ्यासणे.
- भूमी अधिग्रहण व जमीन मोबदल्याविषयीचा आढावा घेणे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांद्वारे माहितीचे संकलन, पृथक्करण व विश्लेषण करून अहवाल तयार करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील मौजे रूकडी व चिंचवाड येथील प्रभावित कुटुंबाचा योग्य रचना केलेल्या मुलाखत अनुसूचीद्वारे अभ्यास केला. प्रकल्पबाधीत जमीन किंवा इतर हानी झाल्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रकल्पबाधीत झालेल्या कुटुंबावर त्याचा परिणाम शोधण्यासाठी संबंधित कुटुंबाचे प्रश्नावली व स्थळभेट आणि चर्चेद्वारा सर्वेक्षण करण्यात आले.

प्रस्तुत अभ्यासाकरीता प्रकल्पबाधीत कुटुंबाची भूमी अभिलेख व क्षेत्रीय तपासणीवर आधारित अचूकपणे सत्याधारित प्राथमिक माहिती संकलित केली. प्रकल्पबाधीत क्षेत्रातील कुटुंबांचा सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ ओळखण्यासाठी अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीवर आधारित खुल्या वातावरणात समूह चर्चा घडवून आणल्या. क्षेत्रभेटीद्वारा संकलित माहितीवर आणि प्रकल्पग्रस्तांबरोबर अधिकची सल्लामसलत करून प्रकल्पाच्या सकारात्मक व नकारात्मक सामाजिक व आर्थिक

परिणामांची व्याप्ती आणि तीव्रतेचे मूल्यांकन केले. अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याविषयी वास्तव आकलन व जाणकारी करून घेतली. तसेच सामाजिक प्रभाव व्यवस्थापन योजनेत समाविष्ट करण्यासाठी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक व्यय आणि लाभ तसेच जमीन गमावणाऱ्या कुटुंबाच्या उत्पन्न घटीचा धोका आणि अशा प्रस्तावित प्रकल्पबाधीत कुटुंबास आदर्श जमीन मोबदल्याविषयी उभयपक्षी स्वीकारार्ह योजना तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. मौजे रूकडी व चिंचवाड येथील प्रकल्पबाधीत कुटुंबासोबत प्रत्यक्षपणे चर्चा दिनांक १७/१८.११.२०१८, ०७/१४/१८.१२.२०१८ व ०६.०१.२०१९ रोजी आयोजित केली होती. या बैठकीत प्रकल्पबाधीत क्षेत्रातील सापनिचे (यानंतर सामाजिक परिणाम निर्धारण असे वाचावे) मुख्य निष्कर्ष तसेच अंतिम निष्कर्ष, अतिरिक्त माहिती आणि अंतिम सापनि अहवाल इत्यादी विषयावर विचार करण्याबाबत विचारविमर्ष केला गेला. प्रकल्पबाधीत कुटुंबाबरोबरच्या चर्चेचा तपशील (व्हिडिओ, छायाचित्रे इत्यादी बाबी) सदर अहवालात आवश्यक तेथे विश्लेषणासह सादर केले आहे.

**II) औपचारिक वास्तव:**

नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर देशात अनेक खाजगी व सार्वजनिक प्रकल्प हाती घेवून विकास प्रक्रिया गतीशील करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्याचा एकंदरीत परिणाम देशाच्या विकास/वृद्धी दरावर दिसून आला. परिणामे खुल्या व्यापार धोरणाच्या अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात औद्योगिक व एकंदरीतच विकासदर झपाट्याने वाढला. या सर्व प्रक्रियांना गती देताना जे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आले. (उदा. विशेष आर्थिक क्षेत्रे, औद्योगिक महामंडळांचा विस्तार, बहुउद्देशीय सिंचन/जलप्रकल्प, बहुपदरी महामार्ग, शहर व निवासी परिसर विस्तार.....इत्यादी) अशा सर्व प्रकल्पांकरीता विविध राज्यांत हजारो हेक्टर शेतजमीनींचे संपादन करण्यात आले. परंतु जमिन संपादन करताना संबंधित शेतकऱ्यांच्या रोजगार पुनर्वसनाकडे दुर्लक्ष झाल्याने देशात आर्थिक दरी निर्माण होवून ती सतत वाढत असल्याचे गेल्या अडीच

दशकांच्या (२५ वर्षे) काळात निष्पन्न झाले. परिणामे शेतकरी वर्गाने कधी संघटित तर अनेकदा असंघटित स्वरूपाचे लढे उभारले. प्रामुख्याने हे लढे आर्थिक व निवासी पुनर्वसन आणि भूसंपादन मोबदला इत्यादीसंदर्भात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील मुंबई–नागपूर समृद्धी महामार्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील तीन लक्ष कोटी रूपये गुंतवणुकीचा तेलशुद्धीकरण प्रकल्पाविरोधात तेथील शेतकऱ्यांनी उभारलेले लढे याची ज्वलंत उदाहरणे आहेत. प्रस्तुत प्रकल्पविरोधामुळे महाराष्ट्र शासनाने भूसंपादन मोबदल्याविषयीचे बाजारमूल्याच्या चारपट मूल्य धोरण बदलून समृद्धी महामार्ग विस्थापित जमिन मालक शेतकऱ्यांना प्रती एकर किमान एक कोटी रूपये (१ कोटी) मोबदला देण्याची तयारी दर्शविली. नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाबाबतही राज्य शासनाने असेच धोरण स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे दिसून आले. नाणार प्रकल्प मार्गी लावण्यासाठी राज्य शासनाने सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार करण्याचे काम गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे यांचेकडे सोपविले होते.

उपरोल्लेखित प्रकल्प अथवा प्रकल्पबाधीत शेतजमिन मूल्यांकनाविषयी राज्य सरकारने घेतलेल्या भूमिकेकडे अंगुलीनिर्देश करता असे निष्पन्न होते की ज्या ठिकाणी प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांचा विरोध तीव्र आहे अशा ठिकाणी राज्य सरकार जमिन मूल्याचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांचा विरोध होणार नाही अशा प्रकारचे मूल्य निर्धारण करते असे दिसून येते. या सर्व बाबींचा व प्रस्तुत अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीतून अवलोकन केलेल्या बाबींवरून प्रकल्पनिहाय मोबदला, जमिन मूल्यांकन, कमाल जमिन धोरण इत्यादी भिन्न असल्याचे स्पष्ट होते.

**परिणामे;**

महाराष्ट्रातील रस्ते, महामार्ग, पायाभूत सुविधा भूसंपादन व जमिन मूल्यांकनाविषयीही राज्य सरकारने मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गाप्रमाणे धोरण अंगिकारण्यास हरकत नसावी. तसेच जमिन मूल्यांकन धोरण जलसिंचन खाते भूमिअधिग्रहणार्थ लागू करून प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यास (एकरी एक कोटी रूपये)

हरकत नसावी. याच्या पुष्ट्यर्थ असा युक्तिवाद असू शकतो की स्वेच्छा पुनर्वसन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे उदरनिर्वाह व रोजगाराचे साधन कायमस्वरूपी संपुष्टात येते. तसेच ज्या प्रकल्पबाधीतांना प्रकल्पलाभक्षेत्रात पर्यायी जमिनी देवू केल्या जातात त्यांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**सारांशात;**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाकरिता राज्य शासनाने अवलंबिलेल्या अथवा प्रस्तावित नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता अवलंबू इच्छित असलेल्या प्रकल्पबाधीत जमिन मूल्यांकनाचे ''एक कोटी रूपये प्रती एकर'' मूल्याचे धोरण राज्यातील सिंचन प्रकल्पांकरिताव प्रकर्षाने प्रस्तुत प्रकल्पाकरिता अवलंबिले तर ते राज्यातील विविध/सर्व प्रकारच्या प्रकल्पबाधीतांकरिता समान पुनर्वसन मूल्याचे व न्याय्य पुनर्वसनाचे धोरण असेल. अन्यथा विविध प्रकल्पबाधीत जमिनींकरिता विविध मूल्य धोरण प्रकल्पग्रस्तांच्या मनात भेदभावाची भावना निर्माण करणारे व पर्यायाने निम्न मूल्य प्रकल्पबाधीतांकरिता अन्यायकारक ठरेल.

# प्रकरणः १

# रस्ते, महामार्ग, पायाभूत सुविधा व भूसंपादन विषयक विवेचन

पूर्वीच्या काळी भारतीय ग्रामीण समाजात शहरी निवासविषयी फारशी आस्था नव्हती. भारतातील शहरीकरणाचा विस्तार, विकास व लोकांची शहरीकरणाविषयीची ओढ हा गेल्या आठ दशकात विकास पावलेला दृष्टिकोन आहे (Janaki Nair, 2015)[१]. यामुळेच सिंगापूरला आशियाची पहिली आधुनिक शहरी संस्कृती संबोधले गेले. शहरीकरणाच्या विस्तार व विकासाने लोकांच्या आधुनिक आशाआकाक्षांना एक प्रकारे वृद्धिंगत करण्याच्या कामी भूमिका बजावली (Burte 2014, Dutton 2015)[२],[३]. अलिकडच्या काळात शहरीकरणाबरोबर ज्या पायाभूत सुविधांच्या विस्ताराची निकड भासू लागली त्या प्रमाणात गुंतवणूकही वाढत गेली. जुन्या लहान अथवा मध्यम शहरांचे रूपांतर मोठ्या महानगरात होवू लागले. याचे मुख्य कारण म्हणजे बदलत्या आर्थिक विकासाच्या गतीमुळे शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. पर्यायाने मोठ्या प्रमाणात ग्रामीण-शहरी स्थलांतर झाल्यामुळे शहरांच्या आजूबाजूच्या उपनगरांची निर्मिती आणि त्याबरोबरच झालेल्या औद्योगिक व सेवाक्षेत्राच्या विस्तारामुळे दळणवळणाच्या साधनांचा प्रचंड विस्तार होवू लागला. पर्यायाने पायाभूत सुविधांची एकंदरीत व्याख्याच बदलून गेली. वेगवान दळणवळणाची निकड भासल्यामुळे वाहतूकीची साधने जशी विकसित होत गेली तसे रस्ते आणि इतर प्रकारच्या वाहतूकीचे व दळणवळणाचे जाळेही विस्तारत गेले. या सर्व पार्श्वभूमीतून रस्ते, महामार्ग, रेल्वे व विमानतळांसाठी प्रचंड

---

[1] *Janaki Nair (2015), Indian Urbanism and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, pp. 54-63.*

[2] *Burte, Himanshu (2014), The Smart City card, Economic and Political Weekly, Vol. XXXXI, No. XXXXVI, pp. 23-25.*

[3] *Dutta, Ayona (2015), New Urban Utopias of Post-Colonial India, Entrepreneurial Urbanization in Dholera Smart City, Gujarat, Dialogues in Geography, Vol. V(I), pp.03-22.*

मोठ्या प्रमाणात जमिनींची आवश्यकता भासू लागली. यातूनच कधी नव्हे ते शेकडो हजारो कोटी रूपये खर्चाचे महामार्ग, रेल्वेमार्ग व विमानतळे निर्माण करण्याच्या विचारांना मूर्त रूप प्राप्त होवू लागले. या कामांच्या पूर्ततेकरीता भांडवल व जमिनीचा प्रश्न महत्त्वाचा वाटला आणि यातूनच जमिनीला आधुनिक काळात भांडवलाचे स्वरूप प्राप्त झाले (Dhanmanjiri Sathe 2015)[४].

आर्थिक उदारीकरणाच्या काळात विकासासाठी चक्रे वेगाने फिरू लागली तशी भांडवल गुंतवणूक आणि त्याकरीता भूमी अधिग्रहणाची प्रक्रियाही वेगाने सुरू झाली. भारतात जमीन अधिग्रहणाचे प्रमुख तीन टप्पे पडतात. पहिला टप्पा ब्रिटिशकालीन भारतात जे विविध प्रकल्प सुरू झाले त्यावेळचे भूमी अधिग्रहण महत्त्वाचे ठरते. यामध्ये प्रामुख्याने धरणे व नवशहरांचा समावेश करावा लागेल. परंतु जमीन अधिग्रहणाच्या प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्यांना दोष देण्याची विकृत प्रवृत्ती दिसून आली. असा आरोप झाला की शेतकरी विकास प्रक्रियेत सहभागी होवू इच्छित नाहीत व पर्यायाने दारिद्र्यात राहतात (Hatekar 2003)[५]. भारतात जमीन अधिग्रहणाचा दुसरा टप्पा म्हणून संबोधले जाते तो म्हणजे हरितक्रांतीचा. या काळात मोठमोठ्या सिंचन प्रकल्पांकरीता प्रचंड प्रमाणात जमिनीचे अधिग्रहण झाले. तसेच भारतीय शेतकऱ्यांनी याकरीता आपल्या जमिनी देवून हा आरोपही चुकीचा आहे हे सिद्ध केले (Subramaniam, C. 1979)[६]. कारण प्रत्येक प्रकल्पाकरीता शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देवू केल्या किंवा तसे करणे त्यांना भाग पडले. यानंतरचा जमीन अधिग्रहणाचा प्रमुख टप्पा म्हणजे १९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतरचा कालखंड होय. उदारीकरणोपरांत गेल्या तीन दशकांच्या काळात

---

[4] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

[5] *Hatekar, N. (2003), Farmers and Markets in Pre Colonial Deccan: The Plausibility of Economic Growth in Traditional Society, Post and Present, No. 178, pp. 116-147.*

[6] *Subramaniam, C. (1979), The New Strategy in Indian Agriculture: The First Decade and After, New Delhi, Vikas Publishing House.*

जमीन अधिग्रहणाचे स्वरूप व आवश्यकता यात प्रचंड बदल व वाढ झाल्याचे दिसून यते. या काळात वेगाने वाढणारे शहरीकरण, उपनगरांचा विसतार व रोजगार संधींचे शहरीकरण पर्यायाने ग्रामीण-शहरी स्थलांतर या सर्व घटकांतून निर्माण झाली ती म्हणजे पायाभूत व दळणवळणाच्या क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक व जमीन अधिग्रहणाची आवश्यकता होय. परंतु या काळात मात्र अगोदरच्या दोन टप्प्यांवरील जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प मोबदला अथवा काही प्रमाणात सक्तीने जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया राबविणे शक्य होणार नाही हे सरकार व ज्या खाजगी क्षेत्राच्या वतीने सरकार हे काम करत असे अशा खाजगी क्षेत्राचीही खात्री पटली (Dhanmanjiri Sathe 2016)[७]. याची प्रचिती खाजगी औद्योगिक क्षेत्र व लोकनियुक्त लोकशाही सरकारलाही आली. या काळात जमीन अधिग्रहणावरून भारत तसेच इतर आशियायी देश व आफ्रिकी देशांतही अनेक तंटे उद्भवले (Cao et.al. 2008, FAO 2009)[८, ९]. भारतातील प्रमुख उदाहरणात पश्चिम बंगालमधील नंदिग्राम, सिंगूर (Maitreesh Ghatak et.al. 2010)[१०] आणि महाराष्ट्रातील नवी मुंबईचा महा मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र व गोवा विशेष आर्थिक क्षेत्र (Dhanmanjiri Sathe 2016)[११] इत्यादींचा समावेश करावा लागेल. नंदिग्राम सिंगूर जमीन अधिग्रहण प्रकरणामुळे तर पश्चिम बंगालचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तीस वर्षांचे सरकार त्यानंतरच्या सार्वजनिक निवडणुकीत पडले. नागरीकरण, रस्ते, महामार्ग, उपनगरे व औद्योगिकीकरणाकरीता आर्थिक उदारीकरणानंतर जी मोठी जमीन अधिग्रहणे

[7] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

[8] *Cao, Guangzhong, Changchun Feng, Ran Tao (2008), Local Land Finance in China's Urban Expansion: Challenges and Solutions, China and World Economy, 16(2), 19-30.*

[9] *FAO (2009), Land Grab and Development Opportunities? Agricultural Investments and International land Deals in Africa, FAO-IFAD Report.*

[10] *Ghatak, Maitreesh and Parikshit Ghosh (2011), The Land Acquisition Bill: A Critique and a Proposal, Economic and Political Weekly, October 8, 2011, Vol. XLVI, No. XXXXI.*

[11] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

घडून आली त्यास उत्तरप्रदेशमधील नोयडा, कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉर, महाराष्ट्रातील अनेक विमानतळे, तामिळनाडूमधील मद्रास शहरातील आडियारचे विशेष आर्थिक क्षेत्र इत्यादींचा उल्लेख करता येवू शकतो. तुलनात्मक विचार केला तर आंध्रप्रदेश, हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू व गुजरात इत्यादी राज्यात जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा फारसा विरोध झाला नाही असे दिसून येते (Jenkin, Kennedy and Mukhopadhyay 2014)[१२]. परंतु ओरीसा, पश्चिम बंगाल इत्यादी राज्यांत मात्र जमीन अधिग्रहण ही निश्चितच सोपी बाब नाही असे परिस्थितीजन्यतेवरून सिद्ध झाले आहे. शेतकऱ्यांचा जमीन अधिग्रहणास विरोध आहे असे अगदी सर्वदूर सत्य मानने निश्चितच चुकीचे आहे. कारण शेतकरी जर त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळणार असेल व त्यांचे योग्य पुनर्वसन होणार असेल तर प्रकल्पाकरीता निश्चितपणे जमीन देण्यास तयार असतात. अर्थात राष्ट्रीय नमुना पाहणी (NSSO 2005)[१३] २००५ च्या अहवालानुसार एकूण ४० टक्के शेतकऱ्यांना शेती व्यवसाय नकोसा झालेला आहेच. या प्रमाणात नंतरच्या काळात वाढसुद्धा झाली असणार (Dhanmanjiri Sathe 2016)[१४]. याचे प्रमुख कारण कृषी क्षेत्रावरील संकटात सापडते. अशावेळी शेतकऱ्यांना जर जमिनीच्या मोबदल्यात योग्य रक्कम अथवा पर्यायी जमीन आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या तर ते निश्चितपणे आपली शेतजमीन देण्यास तयार होतात असेही दिसून आले आहे. अर्थात चीन व मेक्सिको सरकारांनी गेल्या दोन दशकात ज्याप्रमाणे सात कोटी शेतकऱ्यांना आपल्या जमिनींचा सक्तीने त्याग करणे भाग पाडले अशा प्रकारचे औद्योगिकीकरण व आर्थिक विकासाचे प्रमेय भारतात राबवणे शक्य नाही. आंध्र प्रदेशच्या तेलंगणा व आंध्र प्रदेश अशा विभाजनानंतर अमरावती या ठिकाणच्या जमिनी

[12] *Jenkins, R. L. Kennedy and Mukhopadhyay (Eds) (2014), Power, Policy and Protest: The Politics of India's Special Economic Zones, New Delhi, Oxford University Press.*

[13] Govt of India (2005), National Sample Survey Organization, New Delhi

[14] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

आंध्र प्रदेशची नवीन राजधानी निर्माण करण्यासाठी सरकारने अधिग्रहित केल्या. अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याव्यतिरिक्त ३० टक्के विकसित जमीन मूळ मालकांना परत देण्याचे धोरण अवलंबिले. तसेच प्रती एकर जमिनीकरीता दरवर्षी रूपये पन्नास हजार असे दहा वर्षाकरीता देवू केले की त्यामुळे अधिग्रहण मोबदल्याव्यतिरिक्त शेतकऱ्यांचे अधिग्रहित जमिनीतून मिळणारे उत्पन्नही सुरू राहू शकेल. कोणत्याही प्रकल्पाकरीता जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा जो विरोध असतो त्याचे प्रमुख कारण म्हणजे नवीन प्रकल्पातील एकूण भांडवली गुंतवणूकीत न्यूनतम जमिनीचे मूल्य (सन २००४ मध्ये केवळ १.८ टक्के एवढेच होते. सन २००८ मध्ये त्यात वाढ होवून २.९ टक्के इतके झाले) (Kakani R. K., T. L. Ranga Ran and Tigga and Nutan Singh 2008)[१५]. अशा प्रकारच्या न्यून मूल्य धोरणामुळे शेतकऱ्यांचा जमिन अधिग्रहणास विरोध असतो हे प्रामुख्याने समजून घेणे आवश्यक आहे. जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असण्याचे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे संबंधित व त्या आजूबाजूच्या जमिनींचे प्रकल्पोपरांत होणारे मूल्य भांडवलीकरण होय (Value Capitalization). कारण जमीन अधिग्रहण करताना जरी संबंधित जमिनीची किंमत कमी असली तरी प्रकल्पपूर्तीनंतर त्या जमिनीच्या व आजूबाजूच्या जमिनींच्या किंमती अनेकपट वाढतात. आणि अशा जमीन मूल्य भांडवलीकरणाचा फायदा मूळ जमीन मालकास मात्र होत नाही.

## १.१: महामार्ग प्रकल्प कामी प्रसंगी अतिरिक्त जमीन अधिग्रहण:

अनेक रस्ते किंवा महामार्गांची लांबी शेकडो किलोमिटर व रूंदीही प्रचंड असते. पर्यायाने हजारो एकर जमिनीची आवश्यकता भासते. कारण असे महामार्ग अनेक जिल्हे अथवा प्रसंगी विविध राज्यांना जोडणारे तसेच अनेक पदरी वाहतुकीची क्षमता असणारे असतात. देशातील याची प्रमुख उदाहरणे म्हणजे कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉर,

---

[15]*Kakani, R. K., T. L Ranga Ran and Tigga and Nutan Singh (2008), Insights into Land Acquisition Experiences of Private Business in India, Working Paper 08-11, Jamshedpur, XLRI School of Business and Human Resources.*

महाराष्ट्रातील पुणे-मुंबई एक्सप्रेस महामार्ग, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग इत्यादी आहेत. विशेष म्हणजे अशा महामार्ग प्रकल्पांकरीता अधिग्रहित करावयाच्या जमिनीत नवशहरे, उपनगरे व इतर सुविधांकरीताच्या जमीन अधिग्रहणाचाही समावेश केला जातो. उदाहरणार्थ मुंबई-नागपूरला जोडणारा समृद्धी महामार्ग एकूण ७०० किलोमिटर लांबीचा असून त्याकरीता लागणारी एकूण जमिनीची आवश्यकता ८४०० हेक्टर इतकी आहे (१२००० एकर). तर महामार्गालगत विकसित करावयाच्या सोयीसुविधा व पायाभूत सुविधांकरीता अधिक १६०० हेक्टर (४००० एकर) इतकी जमीन अधिग्रहित केली जाणार आहे. म्हणजेच प्रस्तुत प्रकल्पाची एकूण जमीन आवश्यकता दहा हजार हेक्टर म्हणजे पंचवीस हजार एकर इतकी प्रचंड आहे. अशा प्रचंड आवश्यकतेमुळे प्रकल्पपूर्तीस विलंब होवून मूळचा प्रकल्पव्यय ४६,००० कोटी रूपये वरून ५६,००० कोटी रूपये इतका वाढला आहे. कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉरसाठीही एकूण ६९९९ हेक्टर (१७४९७.५ एकर) इतक्या जमिनीची आवश्यकता होती. परंतु रस्ता बांधकामाव्यतिरिक्त इतर सुविधा निर्माण करण्याचेही नियोजन केले गेले व एकूण जमिनीची आवश्यकता वाढली (Janaki Nair 2015)[१६]. अशा प्रकारच्या अतिरिक्त अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असतो. कारण या अतिरिक्त सोयीसुविधा व नवीन शहरीकरणाचा व्यापारी लाभ मात्र प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना मिळत नाही. तसेच उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पोपरांत जमीन मूल्य भांडवलीकरणाच्या लाभापासूनही मूळ प्रकल्पबाधीत जमीन मालक वंचित राहतात. याकामी नव आंध्रप्रदेशचे अमरावती येथील राजधानी प्रमेय अधिक आवश्वासक व आदर्श ठरते.

### १.२: सरकारकरीता धडा:

स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिशकालीन अथवा स्वातंत्र्योत्तर पहिल्या टप्प्यात झालेल्या जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प किंमतीस जमीन अधिग्रहण करून प्रकल्पपूर्ती करणे शक्य

[16] *Janaki Nair (2015), India Urbanization and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, PP. 54-63.*

राहिले नाही. किंबहुना काही प्रमाणात सक्ती करून भूमी अधिग्रहण केले तर लोकशाही राज्यव्यवस्थेत पश्चिम बंगालप्रमाणे तीस वर्षे सत्तेवर असलेले सरकारही निवडणुकीत हार खावून सत्ताच्यूत होवू शकते. परिणामे संबंधित राज्य सरकार व राजकीय पक्ष जमीन दलाल ठरण्याची शक्यता असते. म्हणूनच लोकशाही शासन व्यवस्थेत कोणत्याच राजकीय पक्षाला असे सक्तीचे अधिग्रहण धोरण अवलंबिणे शक्य नाही. किंबहुना गुजरातप्रमाणे शेतकऱ्यांकडून अधिक किंमतीस जमिनी अधिग्रहित करून उद्योजकांना कमी किंमतीत देवू करणे व झालेला तोटा राजकोषीय तरतुदीतून भरून काढण्याचेही धोरण काहीवेळा अवलंबिले जाते. यामुळे सर्वच राजकीय पक्ष व राज्य अथवा केंद्र सरकारांना आपण शेतकऱ्यांच्या बाजूचे आहोत हे सिद्ध करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यातूनच २०१३ चा नवीन जमीन अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्याचा उदय झाला. या कायद्याला तेंव्हा विरोधी पक्षात असलेल्या सर्व पक्षांनीही पाठिंबा दिला होता. नंतर मात्र २०१४ मध्ये नवीन सरकारने कायदा बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु ते शक्य झाले नाही. लोकसभेत पाठिंबा मिळू शकला नाही. पर्यायाने नोव्हेंबर २०१५ मध्ये बिहार विधानसभेची निवडणूक आल्याने केंद्र सरकारने ऑगस्ट २०१५ मध्ये आपला स्वत:चा अध्यादेश नैसर्गिकरित्या मृत होवून देण्याचे धोरण अंगिकारले.

एकंदरीत काय तर जमीन दलाल अशी भूमिका घेवून विकास धोरण राबविणे शक्य नाही. शेतकरी आपली जमीन प्रकल्पकामी देण्यास तयारही असतात. परंतु त्यांना योग्य तो मोबदला व रोजगाराच्या संधी देवून विकास प्रक्रियेत भागीदार करून घेणे आवश्यक आहे. आर्थिक सुधारणोपरांत तीन दशकांच्या काळात असे अनेक अनुभव आले. जमीन अधिग्रहण हा विकास प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक समोर आला. यातूनच २०१३ च्या नवीन अधिग्रहण कायद्याचा उदय झाला.

### १.३: न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने:

बहुउद्देशीय नदी प्रकल्प, विशेष आर्थिक क्षेत्रे, उपनगरे, रस्ते व महामार्ग, मेट्रो रेल्वे इतयादीकरीता मोठ्या प्रमाणात जमिनीची व पर्यायाने अधिग्रहणाची आवश्यकता भासते.

त्यामुळे विस्थापन व पुनर्वसनाचे नियोजन ही एक मोठी समस्या बनली आहे. भूमी अधिग्रहणात फक्त शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनीचांच समावेश नसतो तर केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांच्याही जमिनींचे कित्येकदा अधिग्रहण करावे लागते. त्याकरीता प्रत्येक विभागाची उद्दिष्टे व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे एक विभाग दुसऱ्या विभागास प्रकल्पपूर्तीकामी आवश्यक भूमी अधिग्रहणाकरीता सहकार्य करेलच असे नाही. वन विभागाचे उदाहरण याबाबतीत महत्त्वाचे ठरते. इतर सरकारी विभागांच्या प्रकल्पपूर्तीकरीता जर वन विभागाची जमीन अधिग्रहित करावी लागणार असेल तर त्या बदल्यात इतर ठिकाणची म्हणजे प्रकल्प विभागाच्या अथवा राज्य सरकारच्या ताब्यातील वन जमिनीच वन विभागाला पर्याय म्हणून देवू कराव्या लागतात. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने जलसिंचन, औद्योगिकीकरण, शहरीकरण, संरक्षण विभाग, रेल्वे इत्यादीकरीता अनेकदा भूमी अधिग्रहण केले. परंतु मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बहुतांश प्रकल्पांच्या बाबतीत अनुत्तरीतच राहिला. अशा पूर्व अनुभवांमुळे आणि कृषी क्षेत्रासमोरील इतर समस्यांमुळे भारतात विविध शेतकरी चळवळी उभ्या राहून त्यांनी सरकारसमोर आपले म्हणणे मांडण्यास व प्रसंगी आंदोलनाची तयारी करण्यास प्रारंभ केला. यातूनच नंतरच्या काळात आदर्श पुनर्वसन व अधिग्रहण आणि अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याची समस्या अधिक तीव्र स्वरूप धारण करू लागली. प्रकल्पबाधीतांच्या रोजगार समस्येची जाणीव पूर्वी सरकारला नव्हती असेच काहीसे झाले. किंबहुना त्याबाबत एकदंरीतच प्रशासकीय अनास्था दिसून आली. त्यामुळे नंतरच्या प्रकल्पबाधीतांनी रोजगार, मोबदला, पुनर्वसन व समस्येकडे अंगुलीनिर्देश करून सरकारला विचार करण्यास भाग पाडले. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकरणाकरीता भूमी अधिग्रहण केलेल्या प्रकल्पबाधीतांना मूलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना स्थलांतर करून शहरी झोपडपट्टी व दारिद्र्याचे जीवन जगावे लागले. १९५७ साली पूर्ण केलेल्या कोयना धरणाच्या प्रकल्पबाधीतांचा अनुभव याबाबत अत्यंत विदारक आहे. कारण अद्यापही कोयना धरणग्रस्तांपैकी काहींचे पुनर्वसन बाकी आहे. पर्यायाने

सरकारला न्याय्य विस्थापन व पुनर्वसन धोरणाचा मसुदा तयार करण्याची निकड भासली. साधारणपणे १९८० च्या दशकात भारत सरकारने सर्व प्रकल्पबाधीतांच्या न्याय्य पुनर्वसनाकरीता विचार करणे सुरू केले. या विषयावर अनेकवेळा मंत्रीमंडळ व सार्वजनिक पातळीवर चर्चा झाल्या (Ramaswami Iyer 2007)[१७]. तसेच याकरीता मंत्रीगटाची स्थापना करून विचारविनिमय घडवून आणला (Ramaswami Iyer 2007)[१८]. तब्बल दोन दशके चर्चा व मसुदा आणि पुनर्मसुदा तयार करण्यात गेली. परंतु योग्य मार्ग निघू शकला नाही. पर्यायाने मसुदा तयार होण्यात दिरंगाई झाली. शेवटी ऑक्टोबर २००६ मध्ये ''राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००६'' चा मसुदा चर्चेकरीता समोर आला. त्यानंतर आलेल्या सूचनांची दखल घेवून भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने शेवटी राष्ट्रीय पुनर्वसन कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम हाती घेतले. यातूनच नंतर ''नॅशनल रिहॅबिलिटेशन ॲन्ड रिसेटलमेंट पॉलिसी २००७'' चा अंतिम मसुदा तयार झाला (Walter Fernandez 2004)[१९]. तद्नंतर पुढे ७ सप्टेंबर २०११ रोजी नवीन भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायद्याचा मसुदा लोकसभेत मांडला गेला. एकूण २३५ सदस्यांपैकी २१६ सदस्यांनी मसुद्याच्या बाजूने तर १९ सदस्यांनी विरोधात मतदान केल्याने मसुदा एकमताने मंजूर झाला. दिनांक २९ ऑगस्ट २०१३ रोजी मसुदा लोकसभेत तर दिनांक ४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यसभेत पारित झाल्याने दिनांक २७ सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही केली आणि दिनांक १ जानेवारी २०१४ रोजी कायदा अस्तित्वात येवून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. प्रस्तुत कायदा पारित होवून प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत देशात सार्वजनिक अथवा सरकारला सामाजिक व आर्थिक दृष्टीने लोककल्याणकारी वाटणाऱ्या खाजगी व

---

[17] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, pp. 3103.*

[18] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, pp. 3103.*

[19] *Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, March 20, 2004, pp. 1191.*

सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या प्रकल्पांकरीता ब्रिटिश पारीत १८९४ च्या कायद्याअंतर्गतच जमिनीचे अधिग्रहण करण्याची तरतूद अंमलात आणली जात असे. परंतु १८९४ च्या कायद्या अंतर्गत प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी सरकारवर असत नव्हती. कारण १८९४ च्या ब्रिटिश कायद्यात भूमी अधिग्रहित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व पुनरस्थैर्याच्या बाबतीत जबाबदारीचे उत्तरदायीत्व सरकारवर नव्हते. किंबहुना सरकारने असे उत्तरदायीत्व टाळले होते. परंतु अशा उत्तरदायीत्वाची जबाबदारी २०१३ च्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणामुळे व नवीन कायद्याने सरकारवर व पर्यायाने प्रकल्प विभागावर आली. इतकेच नव्हे तर या धोरणाअंतर्गत प्रकल्पबाधीतांना पुनर्वसनाबरोबरच योग्य मोबदला देण्याची जबाबदारी संबंधित राज्य अथवा केंद्र सरकारच्या प्रकल्प विभागावर देण्यात आली. तसेच या कायद्यामुळे भूमी अधिग्रहण आणि प्रकल्पबाधीत संसाधनांच्या मोबदल्याच्या बाबतीत पारदर्शकतेचा आग्रह धरण्यात आला हे विशेष.

प्रस्तुत कायद्यात विस्थापितांच्या पुनर्वसनाकरीता संबंधित प्रकल्प विभागाने मध्यस्थाची (Ambudsman) नेमणूक करणे बांधनकारक करण्यात आले. परंतु या कायद्याअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना न्यायालयीन प्रक्रियेत जाण्याकरीता फारशी संधी उपलब्ध नसल्याने त्यांचे सरकारवरचे अवलंबित्व अधिक राहते. तथापि प्रस्तुत कायद्याच्या आधीन राहून महाराष्ट्र शासनाने भूमी अधिग्रहण व पुनर्वसनकामी सकारात्मक भूमिका घेवून प्रकल्प विस्थापितांना मोबदला व पुनर्वसन आणि पुनर्निवासाकरीता विशेष प्रयत्न करण्याचे आरंभिले नक्कीच. प्रकल्पग्रस्तांना मोबदला देताना जमिनीच्या वर्तमान बाजारमूल्याच्या चारपट किंमत व पुनर्निवासाकरीता भूखंड तसेच शक्य असेल तेथे प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो हे विशेष.

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड व आजरा तालुक्यातील एकूण दहा गावांना जोडून पुढे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा एकूण ३७ किलोमिटरचा रस्ता मौजे कडगांव येथील पूलबांधणीच्या जमीन संपादनातील अडचणीमुळे प्रलंबित आहे. संपादित

करावयाच्या जमीन मालकास अद्याप कोणतीही लेखी सूचना न देता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून केवळ तोंडी कल्पना देण्याची भूमिका स्विकारल्यामुळे प्रकल्पबाधीत शेतकऱ्याच्या मनात संभ्रम निर्माण झाला असल्याचे दिसून आले. यापूर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे प्रस्तावित अधिग्रहित जमिनीवरील प्रस्तुत प्रकल्पकामी होणारे हे सलग तिसरे अधिग्रहण असल्यामुळे प्रकल्पबाधीत शेतकरी कुटुंब अधिकच अडचणीत असल्याचे प्रकल्प स्थळभेटीवरून लक्षात आले आणि याकामी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची भूमिका असमाधानकारकच असल्याचे निष्पन्न होत आहे.

उपरोल्लेख केल्याप्रमाणे लाभक्षेत्रात सर्वांगिण संक्रमण होवून अपेक्षित विकासाच्या संधी दीर्घकाळ पुढे ढकलल्या जातात किंवा कायमस्वरूपी गमवाव्या लागतात. प्रकल्प दिरंगाईच्या समस्या व्ययवृद्धी अथवा विकास दिरंगाई इतक्याच सीमित नसतात तर अशा दिरंगाईमुळे प्रकल्पबाधीतांच्याही जीवन विकासात अडथळे निर्माण होतात. कारण अधिग्रहणाची घोषणा झाल्यानंतर संबंधित प्रकल्पबाधीतांची गुंतवणूक व कृषी सुधारणा क्षमता आपोआप कुंठीत होऊन संपुष्टात येते. सरकारवरही व्ययवृद्धीचा ताण येतो. इतकेच नव्हे तर यामुळे इतर प्रकल्पाकरीताच्या गुंतवणूकीवरही त्याचा दूरगामी परिणाम होतच असतो. या व इतर बाबी लक्षात घेवून प्रस्तुत प्रलंबित रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण केला असून अहवालात भविष्यातील अशा सर्व घटकांचा साकल्याने विचार व अभ्यास करून प्रस्तुत प्रकल्प अहवाल तयार करण्याचा प्रयत्न आमच्यामार्फत केला आहे.

## प्रकरण: २


# रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाची पार्श्वभूमी


### २.१ प्रकल्पाची माहिती :

कोल्हापूर जिल्ह्यातील तावडे हॉटेल राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ ते गांधीनगर नवे चिंचवाड रूकडी ते राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २०० ला जोडणारा रस्ता प्रजिमा क्रमांक २० कि.मी. रस्ता ता. करवीर व ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूरला जोडणारा नवीन रूकडी चिंचवाड दरम्यान मोठा पूल बांधी व जोडरस्त्यासाठी रस्ता रूंदीकरण होत असलेली जागा संपादन करण्यासाठी रूकडी गावच्या हद्दीत जमिन संपादन करणे आवश्यक आहे.

सदर योजनेमुळे शहरामधील वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणार नाही, त्याचा लाभ रूकडी गावामधील लोकांना होणार आहे. तसेच कोल्हापूर शहर वाहतूक शहरामध्ये न येता शहराच्या बाहेरून होईल. त्यामुळे त्यांना वाहतूक करण्यासाठी शहरामधील रहदारीशी संपर्क होणार नाही. त्यामुळे वाहतुकीचे नियंत्रण होईल. तसेच रूकडी शहराचा सुधारित विकास आराखडा शासनाने मंजूर केलेला आहे.

### २.२ रूकडी गावच्या पुलाचा नकाशा :






स्त्रोत : टिपणी, रूकडी गावं पुलाचा नकाशा, जि. कोल्हापूर

## २.३ प्रकल्पाच्या सद्यस्थितीची विविध छायाचित्रे









## २.४ रूकडी गावचा प्रकल्प तपशील :

| अ. क्र. | तपशील | प्रस्तावानुसार तपशील |
|---|---|---|
| १ | प्रकल्प नाव | गांधीनगर नवे चिंचवाड रूकडी ते रामा क्र. २०० ला जोडणारा रस्ता जि. कोल्हापूर |
| २ | ठिकर्चा | रूकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| ३ | अधिग्रहित रस्ता | रूकडी गावामधून जाणारा रस्ता |
| ४ | प्रकल्पाचा लाभ | गावातील लोक व बाह्य रस्त्यावरून जाणाऱ्या दळणवळणासाठी |
| ५ | प्रकल्पाचे क्षेत्रफळ | १५८० चौ. मी. |
| ६ | प्रकल्प बांधणीचा टप्पा | नवीन रस्ता आवश्यक |

## २.५ उपशमन मूल्यमापन (Mitigation Measures) :

पुनर्वसन आणि पुनर्स्थापन कायदा २०१३ अन्वये अंतर्गत जमीन अधिग्रहण करून प्रस्तुत प्रकल्पाचे काम पूर्ण करणे तसेच शासनाची तयारी सामाजिक समस्यांचे व्यवस्थापन

करण्यासाठी पुरेशी आहे. शिवाय प्रस्तावित अधिग्रहणामध्ये कोणतेही पुनर्वसन आणि पुनर्स्थापना नसल्याने पुनर्वसन आणि पुनर्स्थापना योजना तयार करण्याची आवश्यकता नाही अणि परिणामी पुनर्वसन आणि पुनर्स्थापना धोरणानुसार कोणतेही विशेष फायदे प्रदान केले जाणे आवश्यक नाही.

### २.५.१ विविध संभाव्य सामाजिक परिणामांचे विश्लेषण आणि त्यांचे प्रस्तावित उपाय:

| अ. क्र. | प्रभावाचे प्रकार | झस्थती | उपशमन मूल्यमापन |
|---|---|---|---|
| १ | जमीन गमावणे | होय. रस्त्यासाठी जमीन जाते. | आरएफसीटीएलआरआर नियम, २०१५ (RTFCTLARR Act, 2013) प्रमाणे नुकसान भरपाई |
| २ | बांधलेल्या मालमत्तेची हानी | नाही | -- |
| ३ | उत्पादनक्षम मालमत्तेचे नुकसान | होय | शेती |
| ४ | जीवनमान कमी होणे | नाही | -- |
| ५ | सार्वजनिक उपयुक्तता गमावणे | होय | पाण्याचा स्त्रोत |
| ६ | सामान्य संपत्ती स्त्रोताचे नुकसान | नाही | -- |
| ७ | नाागरी सेवांमध्ये आणि सामान्य संपत्ती स्त्रोत प्रवेश गमावणे | नाही | -- |
| ८ | सांस्कृतिक गुणधर्म कमी होणे | नाही | - |
| ९ | असुरक्षित विस्थापन गट | नाही | -- |
| १० | नैसर्गिक संपत्तीचे नुकसान | होय | वृक्ष |

## २.६ प्रकल्पाचे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम (Positive and Negative Impact of the Project)

प्रकल्प प्रस्ताव/व्यवहार्यता अभ्यास, प्रकल्प खर्च आणि टप्प्याटप्प्याने प्रस्तावित पायाभूत सुविधा, कार्यबल आवश्यकता (तात्पुरती आणि कायमस्वरूपी), जोखीम, उत्पादन लक्ष्य इत्यादींचा अभ्यास करून एक विस्तृत सामाजिक खर्च आणि लाभाचे विश्लेषण सादर करणे आवश्यक होते. प्रकल्पाच्या परिणामी सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम निम्नउल्लेखित तक्त्यात दिले आहेत.

### २.६.१ प्रकल्पाचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम:

| अ. क्र. | सकारात्मक परिणाम | नकारात्मक परिणाम | टिप्पणी |
|---|---|---|---|
| १ | | जमीन अधिग्रहण | नमूद करण्यात आलेल्या सर्व परिणाम सर्वेक्षण प्रक्रियेत विविध भागधारकांनी सुचविले आहेत. जर प्रकल्पातील नकारात्मक परिणाम यशस्वीरित्या कमी केले जाऊ शकले तर प्रस्तावित प्रकल्पाचा सार्वजनिक फायदा होईल. |
| २ | | शेती | शेतजमीन व शेतातील उत्पादनाचे नुकसान होते. |
| ३ | | नैसर्गिक | वनस्पती, झाडे व इतर नैसर्गिक संपत्तीचे नुकसान होते. |
| ४ | दळणवळण | | हा शहराबाहेरील रस्ता झालेमुळे कोल्हापूर होणारी वाहतूक कोंडी कमी होईल. |
| ५ | रस्ता बांधकाम | | दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा |

## २.७ गट नंबर नुसार माहिती:

### २.७.१ रूकडी गाव बाधित लाभार्थी यादी:

**प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ट जमिनीचा तपशील**
**मौजे : रूकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर**

| अ. क्र. | भूधारकाचे नांव | गट नंबर/ सर्व्हे नं. | भूधारणा पद्धती | गा.न.नं. ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र हे. आर. | खरेदी करावयाचे क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|---|
| १ | संदिप आप्पासो पाटील | १५३१/अ पैकी | खा. | ०.४७.०० पो.ख. ०.१६ | ०.३७६७ |
| | संगिता जयपाल गायकवाड | | | | |
| | सरकार कब्जा | | | | |
| | इतर अधिकार<br>धाम सेवा वि. का. स. (विकास) सेवा सो. लि. | | | | |
| | हिंदू समाज स्मशान भूमि | | | | |
| २ | संदिप आप्पासो पाटील | १५३१/ब पैकी | खा. | ०.६५.०० | ०.२२७९ |
| | रावसाहेब श्रीपती मोहिते | | | | |
| | इतर अधिकार<br>धाम सेवा वि. का. स. (विकास) सेवा सो. लि. | | | | |
| | बँक ऑफ इंडिया | | | | |
| ३ | अशोक जगदिश पाटील | १५३० पैकी | खा. | १.०९०० | ०.०३९९ |
| | अजित जगदिश पाटील | | | | |
| | अनिल जगदिश पाटील | | | | |
| | इतर अधिकार<br>बँक ऑफ इंडिया शा. रूकडी | | | | |
| ४ | बाबासो अप्पा गवाणे | १५३२ पैकी | खा. | ०.७८.०० पो. ख. ०.०३ | ०.३९२७ |
| | बाळासो बापू गवाणे ए. पु. | | | | |
| | इतर अधिकार<br>रूकडी शेतकी वि. का. स. सेवा सोसा., रूकडी | | | | |
| | बँक ऑफ इंडिया शा. रूकडी | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | आबुतालीब दस्तगीर मुजावर | १५९३ पैकी | खा. | ०.२९०० | ०.००५४ |
| | अबुबकर दस्तगीर मुजावर | | | | |
| | धाम सेवा वि. का. स. (विकास) सेवा सो. लि. | | | | |
| | बँक ऑफ इंडिया शा. रूकडी | | | | |
| ६ | शंकर भाऊ आंबी | १५९१ पैकी | खा. | ०.२००० | ०.००२५ |
| | सिदगोंडा भाऊ अपाक आई रूक्काबाई | | | | |
| ७ | आबुतालीब दस्तगीर मुजावर | १५९३/ब पैकी | खा. | ०.२८०० | ०.०००७ |
| | अबुबकर दस्तगीर मुजावर | | | | |
| | इतर अधिकार<br>बँक ऑफ इंडिया शा. रूकडी | | | | |
| ८ | प्रकाश बाळू आंबी | १५८८/१ पैकी | खा. | १.०१.०० | ०.००५० |
| | बापू उर्फ दत्तू महादेव आंबी | | | | |
| | आक्काताई आण्णाप्पा आंबी | | | | |
| | कृष्णा शिवाप्पा आंबी | | | | |
| | आनंदा शिवाप्पा आंबी | | | | |
| | बाबासो दत्तू आंबी | | | | |
| | रावसाहेब दत्तू आंबी | | | | |
| | भाऊसाहेब दत्तू आंबी | | | | |
| | राजकुमार दत्तू आंबी | | | | |
| | कृष्णाबाई गजानन आंबी | | | | |
| | आशाराणी राहुल आंबी | | | | |
| | इतर अधिकार<br>दि ग्रमसेवा सो. रूकडी | | | | |
| | जवा. ना. सह. पतसंस्था मर्या., रूकडी | | | | |









## प्रकरण: ३

# माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती

**प्रास्ताविक**

प्रस्तुत अहवालाच्या प्रकरण क्रमांक ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करवीर तालुक्यातील गांधीनगर-चिंचवाड गावांतून जाणारा राज्य महामार्ग क्रमांक २०० ला जोडणारा रस्ता व मुख्यत्वे मौजे रूकडी येथे पूल बांधकाम गेली काही वर्षे प्रलंबित आहे. त्यामुळे प्रकल्पव्ययात वृद्धी होवून एकूण खर्चातही वाढ झालेली आहे. प्रस्तुत प्रकल्प विलंबाचे महत्त्वाचे कारण म्हणजे भूमी अधिग्रहण व जमीन मोबदल्यासंबंधी निर्माण झालेली तेढ होय. याच प्रमुख समस्येचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तत प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास हाती घेतला असून प्रस्तुत अभ्यास मुख्यत्वे खाली नमूद केलेल्या उद्दिष्टपूर्तीवर निर्भर आहे.

### ३.१ अभ्यासाची उद्दिष्टे :

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल खाली नमूद केलेल्या उद्दिष्टंवर आधारित आहे.

- प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे.
- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणामांची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य संधी व व्यय तसेच त्याग या घटकांची चिकित्सा करणे.
- डिसेंबर २०१३ च्या भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास तसेच प्रकल्पबाधीतांच्या अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याविषयीची चिकित्सा करणे.

- प्रकल्पबाधीत जमिनीच्या बदल्यात जमीन देवू करणे शक्य आहे काय याविषयीची पडताळणी करणे.
- प्रकल्पबाधीतांवरील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिणाम अभ्यासणे.
- भूमी अधिग्रहण व जमीन मोबदल्याविषयीचा आढावा घेणे.

## ३.२ अभ्यास पद्धती:

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांद्वारे माहितीचे संकलन, पृथक्करण व विश्लेषण करून अहवाल तयार करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील मौजे रूकडी व चिंचवाड येथील प्रभावित कुटुंबाचा योग्य रचना केलेल्या मुलाखत अनुसूचीद्वारे अभ्यास केला. प्रकल्पबाधीत जमीन किंवा इतर हानी झाल्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रकल्पबाधीत झालेल्या कुटुंबावर त्याचा परिणाम शोधण्यासाठी संबंधित कुटुंबाचे प्रश्नावली व स्थळभेट आणि चर्चेद्वारा सर्वेक्षण करण्यात आले.

## ३.३ अभ्यासाची पूर्वपिठीका:

प्रस्तुत अभ्यासाकरीता प्रकल्पबाधीत कुटुंबाची भूमी अभिलेख व क्षेत्रीय तपासणीवर आधारित अचूकपणे सत्याधारित प्राथमिक माहिती संकलित केली. प्रकल्पबाधीत क्षेत्रातील कुटुंबांचा सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ ओळखण्यासाठी अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीवर आधारित खुल्या वातावरणात समूह चर्चा घडवून आणल्या. क्षेत्रभेटीद्वारा संकलित माहितीवर आणि प्रकल्पग्रस्तांबरोबर अधिकची सल्लामसलत करून प्रकल्पाच्या सकारात्मक व नकारात्मक सामाजिक व आर्थिक परिणामांची व्याप्ती आणि तीव्रतेचे मूल्यांकन केले. अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याविषयी वास्तव आकलन व जाणकारी करून घेतली. तसेच सामाजिक प्रभाव व्यवस्थापन योजनेत समाविष्ट करण्यासाठी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक व्यय आणि लाभ तसेच जमीन गमावणाऱ्या कुटुंबाच्या उत्पन्न घटीचा धोका आणि अशा प्रस्तावित प्रकल्पबाधीत कुटुंबास आदर्श जमीन मोबदल्याविषयी उभयपक्षी स्वीकारार्ह योजना तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. मौजे रूकडी व चिंचवाड येथील प्रकल्पबाधीत कुटुंबासोबत प्रत्यक्षपणे चर्चा दिनांक १७/१८.११.२०१८, ०७/१४/१८.१२.२०१८ व ०६.०१.२०१९ रोजी आयोजित केली होती. या बैठकीत प्रकल्पबाधीत क्षेत्रातील सापनिचे (यानंतर सामाजिक परिणाम निर्धारण असे वाचावे) मुख्य निष्कर्ष तसेच अंतिम निष्कर्ष, अतिरिक्त माहिती आणि अंतिम सापनि अहवाल इत्यादी विषयावर विचार करण्याबाबत विचारविमर्ष केला गेला. प्रकल्पबाधीत कुटुंबाबरोबरच्या चर्चेचा तपशील (व्हिडिओ, छायाचित्रे इत्यादी बाबी) सदर अहवालात आवश्यक तेथे विश्लेषणासह सादर केले आहे.

## ३.४ सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती:

### ३.४.१ सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया:

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवालात करवीर तालुक्यातील मौजे रूकडी व चिंचवाड या गावांना छेदून जाणाऱ्या प्रलंबित राज्य महामार्ग क्रमांक २०० ला जोडणारा २.६४ किलोमिटरचा रस्ता व २०० मीटर पूलाच्या प्रकल्पाबाबत अपेक्षित असलेला सकारात्मक व नकारात्मक बदल तसेच प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम समजणे, मोजणे आणि त्याकरीता संवाद साधने अत्यंत आवश्यक होते. सामाजिक व आर्थिक नुकसानीचे मोजमाप करण्यासाठी खालील पद्धतीचा वापर करण्यात आला. अपेक्षित, सुयोग्य, सत्याधारित व पृथक्करणक्षम माहिती संकलनाकरीता अभ्यासगटासमोर खाली नमूद केलेले प्रमुख प्रश्न होते;

१. कुणाकडून कोणत्या घटकांविषयी माहिती संकलित करावी?

२. अपेक्षित माहिती संकलन कसे साध्य करावे?

३. नेमकी कोणत्या प्रकारची माहिती संकलन करणे आवश्यक आहे?

४. संबंधित माहिती संकलन सुयोग्य व अचूकपणे कसे करता येईल?

५. संकलित माहितीच्या सहाय्याने अचूक प्रकल्प परिणाम कसे निश्चित केले जावू शकतात?

६. प्रलंबित प्रकल्पाचे अचूक परिणाम दर्शविणारी माहिती म्हणजे नेमकी कोणती माहिती व आकडेवारी असू शकेल?

७. संकलित माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करण्याचा अचूक व सुयोग्य मार्ग अथवा पद्धती कोणत्या असू शकतात?

८. प्रकल्पबाधीतांबरोबरील संवादातून नेमके काय साध्य होणार?

९. संकलित माहिती व आकडेवारीतून निष्पन्न होणारे निष्कर्ष नेमके कोणत्या उद्दिष्टांची पूर्तता करू शकणारे असतील? .......इत्यादी

## ३.५ सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे:

अभ्यासगटाने रूकडी व चिंचवाड या गावांना जोडणारा रस्ता व पूलासंबंधी प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम मूल्यांकनाची योजना आखत असताना सर्वेक्षण मनुष्यबळ निवड आणि प्रशिक्षणामध्ये गुणवत्ता वेळ खर्च केला आहे. सुरूवातीस सर्वेक्षणाचा हेतू मूल्यांकन एकक, उपलब्ध वेळ, पुढील कामाचे नियोजन आणि इतर संबंधित समस्यांबद्दल जाणून घेणे आवश्यक होते. तद्नुषंगाने सापनि अभ्यासगटाने मौजे रूकडी रस्ता व पूलबांधणी प्रकल्पाचे ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता व इतर अधिकारी-कर्मचारी आणि महसूल अधिकारी यांच्यासोबत चर्चा केली. अशी चर्चा केल्यानंतर लक्षात आले की संबंधित कायदे व नियमांनुसार सापनि प्रक्रियेत मूलभूतपणे तीन घटकांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे. ते तीन घटक पुढीलप्रमाणे;

१. प्रकल्पबाधीतांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात अशा सामाजिक-आर्थिक परिस्थितीचे सविस्तर मूल्यांकन करण्याची आवश्यकता.

२. दुर्बल घटक जसे की महिला, मुले व वयस्क यांचेवर होणारा परिणाम आणि प्रकल्पबाधीत व स्थावर विस्थापन जसे की घर, वृक्षसंपदा, निवारा, जैवनैसर्गिक घटक पशुपक्षी आणि वनसंपदेचे स्खलन व नाश इत्यादी परिणामांचा सविस्तर अभ्यास आणि.....

३. तद्नुषंगिक किमान अनिष्ट परिणामांसाठी सुयोग्य आर्थिक नुकसान भरपाई विषयक विस्तृत योजना सुचविणे.

## ३.६ प्रकल्प प्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी:

प्रस्तुत मौजे रूकडी व चिंचवाड या गावांना स्पर्श करून जाणारा रस्ता राज्य महामार्ग क्रमांक २०० ला जोडणारा असून रस्ता व २०० मीटर पुलाच्या कामात रूकडी गावातील शेतकऱ्यांची जमीन अधिग्रहित होणार आहे. परंतु सर्व प्रकल्पबाधीतांची लोकवस्ती मात्र अबाधित राहते. वास्तव स्थितीच्या अवलोकनासाठी प्रारंभिक क्षेत्रभेट आयोजित केली आणि क्षेत्र सर्वेक्षण करून अभ्यासगटाने क्षेत्रे, झाडे, सामाजिक व आर्थिक आणि सांस्कृतिक मूलभूत संरचना आणि लोकवस्तीच्या भौगोलिक मर्यादांची चांगल्या प्रकारे माहिती घेतली.

### ३.६.१ बहुविध स्त्रोत माहिती संकलन :

यानंतरच्या टप्प्यात सापनि अभ्यासगटाने कोल्हापूर जिल्हा सार्वजनिक बांधकाम व महसूल विभागाकडून प्रस्तुत प्रकल्पासाठी अधिग्रहित करू इच्छित जमिनीची माहिती संकलित केली. एकत्रित केलेल्या आकडेवारीची पडताळणी करून प्रकल्पाशी निगडित आवश्यक त्या सर्व माहितीचा आढावा घेतला. प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार करण्यासाठी उपरोल्लेखित गावे व शेतकऱ्यांची किती जमीन प्रकल्पबाधीत होते व प्रस्तुत अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्यात कशा प्रकारे सुयोग्य मोबदला देता येईल याकरीताचे अवलोकन करण्याचा प्रयत्न केला. तसेच लाभार्थी गावनिहाय सांख्यिकीय आढावा घेतला. प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुबांचे सामाजिक, आर्थिक व

सांस्कृतिक आकलन करून घेवून कुटुंबाविषयी इतर सर्व बाबी जाणून घेतल्या. अन्य माहिती संकलन कामी दुय्यम स्त्रोत माहितीचा वापर करण्यात आला तसेच प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक अशा दोन्ही प्रकारच्या गावांचे मूलभूत सुविधांविषयीही सर्वेक्षण करून प्रकल्प, व्यय व लाभविषयक तसेच प्रकल्प आवश्यकतेचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला.

### ३.६.२ प्रकल्पबाधीत, प्रतिगामी – अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूहः

सापनि अभ्यासगटाने उपरोल्लेखित प्रकल्पबाधीत शेतकरी आणि प्रतिगामी – अवगामी भागधारक इत्यादी घटकांकडून माहिती संकलित करण्यासाठी संरचित प्रश्नावली व मुक्तसंवाद, समूहसंवाद इत्यादी तंत्रांचा अवलंब केला. प्रकल्प प्रभावित कुटुंबाच्या सहभागाचा एक भाग म्हणून केंद्रित समूहचर्चेच्या (एफजीडी) माध्यमातून उपरोल्लेखित घटकांचा समावेश करण्यात आला. प्रस्तुत रस्ता व पूल रूकडी शिवारातून मार्गिक होवून पुढे राज्य महामार्ग क्रमांक २०० ला जोडणारा रस्ता व पूल प्रकल्पाचे काम गेली काही वर्षे आवश्यक आहे. प्रलंबनाची मुख्य कारणे प्रकल्पबाधीत शेतकरी कुटुंबांकडून करावयाचे भूसंपादन आणि संपादित जमिनीचा मोबदला असेच मर्यादित असल्याचे आमच्या लक्षात आले. त्यामुळे प्रस्तुत प्रलंबित रस्ता व पूल बांधकामी आवश्यक जमिनीच्या मोबदल्याची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने प्रश्नावली तयार करताना प्रश्नांची विचारपूर्वक योजना केली गेली. प्रकल्प गेली काही वर्षे अपेक्षित असल्याने प्रकल्पबाधीत व संभाव्य प्रकल्प लाभधारक अशा दोन्ही समूहांचे आर्थिक व सामाजिक नुकसान झाले आहे. याचे मुख्य कारण प्रस्तुत प्रकल्पाचे संभाव्य लाभ तपासणे असे होते. तसेच डिसेंबर २०१३ च्या अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांना त्यांच्या अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्यात सुयोग्य आर्थिक भरपाई देणेविषयी अभ्यासांती सूचना करणे गरजेचे असल्याने आम्ही प्रस्तुत अभ्यास काटेकोरपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. संकलित करावयाची प्राथमिक माहिती अचूक, विश्वासार्ह, पृथक्करणक्षम व पर्याप्त असणे अत्यंत आवश्यक होते. तसेच

प्राथमिक माहितीद्वारा प्रकल्पबाधीत कुटुंबाचे एकूणच तुलनात्मक कृषी संबंधाचे (Agrarian Relations) आकलन होणेही आवश्यक होते. प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी करताना असे निदर्शनास आले की, रूकडी गावातील प्रस्तुत प्रकल्पबाधीत एकूण ७ मूळ खातेदार गटातील जमिन या प्रकल्पामुळे बाधीत होत आहे. पर्यायाने सापनि अभ्यासगटाने या सर्व बाधीत कुटुंबाचे सर्वेक्षण (House Survey) करण्याचे निश्चित केले. म्हणजेच सर्वेक्षणादरम्यान प्रस्तुत कुटुंबाबरोबर विस्तृत चर्चा करून प्रश्नावलीच्या माध्यमातूनही कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले. असे करताना आम्हास उपरोल्लेखित प्रकल्पबाधीत कुटुंबातील सर्व व्यक्ती तसेच कुटुंबप्रमुखांस प्रत्यक्ष भेटणे शक्य झाले. अशा प्रकारे प्रकल्पबाधीत सर्व कुटुंबाचे सर्वेक्षण पूर्ण होवू शकल्याने आम्ही त्यास जनगणना सर्वेक्षण असे संबोधले आहे. प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुंबाचे सखोल सर्वेक्षण तर झालेच परंतु प्रस्तुत कुटुंबांची सर्व सामाजिक व आर्थिक स्थिती लक्षात आली. अशा प्रकारे प्रकल्पबाधीत कुटुंबाचे प्रस्तुत अभ्यास अहवालाकरीता प्रत्यक्षपणे घरी जावून सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आहे. प्रस्तुत सर्वेक्षणातून प्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करून अहवालात आवश्यक त्या ठिकाणी सविस्तरपणे निष्कर्ष मांडले आहेत. प्राथमिक माहिती संकलन सर्वेक्षणात अधिकाधिक नव्हे तर कुटुंबाच्या सर्वच माहितीचा समावेश करू शकल्याने प्रस्तुत अहवाल सत्यतेच्या महत्तम निकषांवर उतरणारा आहे असा युक्तिवाद सापनि अभ्यासगटामार्फत केला जावू शकतो.

### ३.६.३ विशेष समूह चर्चा (Focused Group Discussions):

प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित प्राथमिक माहितीव्यतिरिक्त दिनांक १३/१४/१५/१६/१७/१८/१९/२०/२१/२२/२३/२४/२५.०१२०१९ व २६/२७.०१.२०१९ दरम्यान सापनि अभ्यासगटाने प्रकल्पबाधीत कुटुंब व प्रकल्प लाभधारक गावांची प्रत्यक्ष भेट घेवून प्रकल्पबाधीतांबरोबर विशेष समूह चर्चा (FGDs) घडवून आणल्या. यामुळे प्राथमिक सर्वेक्षणातून प्राप्त माहितीचे अधिक आकलन होण्यास मदत झाली. तसेच प्राथमिक माहिती अधोरेखितही होवू शकली. तसेच सर्वेक्षणप्राप्त

प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण अधिक अचूक पद्धतीने होवू शकले. कारण सर्वेक्षण व चर्चेच्या काळात सापनि अभ्यासगटाने मौजे रूकडी व चिंचवाड गावांच्या (प्रकल्पलाभधारक) भेटी घेवून प्रकल्पाचे लाभ तसेच प्रकल्प अधिग्रहित जमिनींची प्रत्यक्षपणे पाहणी करण्याचे काम पूर्ण केले. कारण डिसेंबर २०१३ च्या ''अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास'' कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांना त्यांच्या प्रकल्पबाधीत शेतजमिनींच्या मोबदल्यात योग्य त्या प्रमाणात आर्थिक मोबदला मिळणे अत्यावश्यक मानले आहे.

## प्रकरण : ४

# रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांचा प्राथमिक अभ्यास व स्थलवास्तवाचे आकलन


### पार्श्वभूमी

कोल्हापूर जिल्ह्यातील मौजे चिंचवाड व रूकडी गावांतील एकूण ७५ कृषी गट जमिनीमधून भूसंपादनाची आवश्यकता असलेला मौजे रूकडी शिवारातील २०० मीटर लांबीचा पूल व २.६४ कि.मी. लांबीचा रस्ता बांधणे प्रलंबित आहे. या प्रलंबनातून मार्ग काढण्याकामी प्रस्तुत सापनि अहवालाचे काम आम्ही शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण केले असून प्रस्तुत प्रकरणात या अहवालाकामी केलेल्या प्राथमिक माहितीच्या पृथक्करणाचा समावेश आहे. प्रस्तुत प्राथमिक माहिती प्राप्त करण्यासाठी आम्ही प्रकल्पबाधीत कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देवून पूर्वनियोजित प्रश्नावलीच्या माध्यमातून सर्व माहिती प्राप्त करून घेतली आहे.

**तक्ता ४.१: रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबांचे धार्मिक विवरण**

| धर्म | टक्केवारी |
|---|---|
| हिंदू | २४.५३ |
| मुस्लिम | ३.७७ |
| जैन | ४९.०६ |
| बौद्ध | १८.८७ |
| अन्य | ३.७७ |


संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण




## तक्ता ४.२ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचा प्रकार

| कुटुंबाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|
| **एक सदस्य** | १.८९ |
| **विभक्त** | ३५.८५ |
| **एकत्रित** | ६२.२६ |


संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण



## तक्ता ४.३ : रूकडी रस्ता–पूल प्रकल्पबाधीत कुटुंबातील शैक्षणिक स्थिती

| शिक्षण | टक्केवारी |
|---|---|
| प्राथमिक | ३०.३४ |
| माध्यमिक | २८.०९ |
| उच्च माध्यमिक | २१.३५ |
| पदवीधर | १४.६१ |
| उच्च पदवीधर | ४.१२ |
| पदविका | ०.३७ |
| तांत्रिक शिक्षण | ०.७५ |
| ई. टी. आय. | ०.०० |
| इतर | ०.३७ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण




उपरोल्लेखित तक्ते क्रमांक १, २ व ३ मधील प्राथमिक माहितीवर दृष्टिक्षेप टाकला तर असे निदर्शनास येते की, प्रकल्पबाधीत कुटुंबे सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिकदृष्ट्या सर्व स्तरातील असून बहुतांशी कुटुंबे (६२.२६ टक्के) एकत्र कुटुंब पद्धती प्रकारात येतात. तसेच शैक्षणिक स्थितीचा आढावा घेता असे दिसून येते की, त्यातील किमान सदस्य पदवीधर (१४.६१%), उच्च पदवीधर (४.१२%) व इतर तांत्रिक पदवीधर आहेत.

**तक्ता ४.४ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबांचे व्यावसायिक वर्गीकरण**

| व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|
| **शेती** | ३७.७१ |
| **नोकरी** | ५.०८ |
| **शिक्षण** | १९.०७ |
| **घरकाम** | ३४.७५ |
| **मजुरी** | ०.४२ |
| **इतर** | २.९७ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण




रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंब सदस्यांचे व्यवसायिक वर्गीकरण पाहता असे लक्षात येते की, तक्ता क्रमांक ५.४ बहुतांशी कुटुंब सदस्य शेती (३७.७%) व घरकाम (३४.७५%) करताना दिसून येतात. याव्यतिरिक्त शिक्षण घेणाऱ्या कुटुंब सदस्यांचे प्रमाण

१९.०७ टक्के असून नोकरी करणारे सदस्य ५.०८ टक्के आहेत. यावरून असाच निष्कर्ष मिळतो की, बहुतेक कुटंबाचा उदरनिर्वाह शेती व्यवसायावर अवलंबून असल्यामुळे त्यांना त्यांच्या प्रकल्पबाधीत जमिनीचा योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे.

**तक्ता ४.५: रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचा सामाजिक व संस्थात्मक सहभाग**

| संस्थेचे नांव | संख्या |
|---|---|
| **ग्रामपंचायत** | ४ |
| **पंचायत समिती** | ० |
| **वि. का. सोसायटी** | १२ |
| **ग्राम विकास मंडळ** | ० |
| **जंगल कामगार संस्था** | ० |
| **सहकारी बँक** | २ |
| **बचत गट** | १७ |
| **दूध संस्था** | २ |
| **बाजार समिती** | ० |
| **भजनी मंडळ** | ० |
| **जात पंचायत** | ० |
| **तरूण मंडळ** | २ |
| **महिला मंडळ** | ० |
| **अन्य** | ० |


संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

प्रकल्पबाधीत कुटुंबातील एकूण सदस्यांपैकी अत्यंत अत्यल्प सदस्य विविध सामाजिक, राजकिय व आर्थिक अथवा सांस्कृतिक संस्थांचे सदस्य आहेत.

**तक्ता ४.६: रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे जमिन मालकीवरून विवरण**

| जमिन आहे का? | टक्केवारी |
|---|---|
| **आहे** | ९६.२३ |
| **नाही** | ३.७७ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण




एकूण प्रकल्पबाधीत कुटुंबापैकी ९६.२३ टक्के सदस्यांना आपली स्वत:ची शेतजमिन आहे असे नमूद करतात. तर ३.७७ टक्के सदस्य स्वत:च्या नावावर शेतजमिन नाही असे नमूद करतात. याचे कारण असे की एकूण ७५ शेतजमिन गट प्रकल्पबाधीत होतात. परंतु प्रत्येक गटक्रमांकानुसार वारसदार जास्त असल्यामुळे एकूण प्रकल्पबाधीतांची संख्या ७५ पेक्षा जास्त येते. यातील काही प्रकल्पबाधीतांच्या (वारसांच्या) नांवे जमिन नसल्यामुळे त्यांनी स्वत:च्या नावे जमिन नाही असे नमूद केल्याचे निदर्शनास येते.

**तक्ता ४.७ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे घर मालकी विवरण**


| घराची मालकी | टक्केवारी |
|---|---|
| **स्वत:चे** | ९६.३० |
| **भाड्याचे** | १.८५ |
| **सामाईक** | १.८५ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

## तक्ता ४.८: रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबांच्या मालकीच्या घराचे विवरण

| घराचे स्वरूप | टक्केवारी |
|---|---|
| **कच्चे** | २२.२२ |
| **पक्के** | ५७.४१ |
| **अर्धे कच्चे** | २०.३७ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण





## तक्ता ४.९: रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या मालकीच्या घराचे आकारमान

| खोल्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|
| १ | ५.०६ |
| २ | ११.३२ |
| ३ | २४.५३ |
| ४ | ३३.९६ |
| ५ | ५.६६ |
| ६ | १५.०९ |
| ८ | १.८९ |
| ९ | १.८९ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

४.७ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या मालकीच्या घराचे आकारमान टक्केवारी




प्रकल्पबाधीतांच्या प्राथमिक माहितीवरून घर मालकीच्या विवरणावर दृष्टिकोन टाकला तर बहुतांश (९६.३० टक्के) प्रकल्पबाधीतांकडे स्वत:चे राहते घर आहे असे निदर्शनास येते. तर १.८५ टक्के प्रकल्पबाधीत भाड्याचे घरात आणि उर्वरित १.८५ टक्के प्रकल्पबाधीत स्वत:चे नावावर नसलेल्या परंतु कुटुंबाची सामायिक मालकी असलेल्या घरात वास्तव्य करतात. यापैकी २२.२२ टक्के प्रकल्पबाधीतांची घरे कच्च्या बांधकामाची, ५७.४१ टक्के पक्क्या तर २०.३७ टक्के घरे अर्धपक्की असलेली दिसून आली. याचाच अर्थ अनेक प्रकल्पबाधीतांची आर्थिक स्थिती फारशी श्रीमंतीची नाही असाच वेध यातून निर्माण होतो. तसेच प्रकल्पबाधीत कुटुंबे वास्तव्य करत असलेल्या घराच्या आकारमानावर नजर टाकताही असाच निष्कर्ष मिळतो. अनुक्रमे तीन व चार खोल्या असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अनुक्रमे २४.५३ टक्के व ३३.९६ टक्के इतके आहे. सहा खोल्यांची घरे असणारी एकूण १५.०९ टक्के कुटुंबे आहेत तर दोन खोल्यांच्या घरात वास्तव्य करणारी एकूणपैकी ११.३२ टक्के कुटुंबे आहेत असे दिसून येते. प्रकल्पबाधीतांची घरमालकी, घराचे स्वरूप वा खोल्यांच्या संख्येवरून असाच निष्कर्ष निघतो की सर्व प्रकल्पबाधीत कुटुंबे साधारणपणे सुमार आर्थिक स्थिती असलेलीच आहेत. त्यामुळे या सर्वांच्या प्रकल्पबाधीत शेतजमिनीचा मोबदला देताना अन्याय होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष देणे आवश्यक आहे.

**तक्ता ४.१०: रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाकडील टिकावू उपभोग्य वस्तू व कृषी भांडवली वस्तूंची मालकी**

| मालकीच्या वस्तू व साधने | टक्केवारी |
|---|---|
| स्टील कपाट | ६१.११ |
| पलंग | ८५.१९ |
| पंखा | ८८.८९ |
| फ्रीज | ६१.११ |
| एल. पी. जी. गॅस | ९०.७४ |
| गोबर गॅस | ११.११ |
| टी. व्ही. | ८८.८९ |
| फोन | ११.११ |
| फर्निचर | ४२.५९ |
| कॅमेरा | ५.५६ |
| मोबाईल | ९४.४४ |
| मोटार सायकल | ८१.४८ |
| जीप/चार चाकी | १४.८१ |
| ऑईल इंजिन/मोटर | ५.५६ |
| इलेक्ट्रिक पंप | ५.५६ |
| ठिबक/तुषार संच | ३.७० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

प्रकल्पबाधीत कुटुंबाकडील टिकाऊ उपभोग्य वस्तू व कृषी आदानांच्या मालकीवरून विवरणाकडे दृष्टिक्षेप टाकला तर असाच निष्कर्ष निघतो की, अल्प प्रमाणातील डिझेल पंप (५.५६ टक्के), विज पंप (५.५६ टक्के) व ठिबक तथा तुषार संच (३.७० टक्के)


वगळता इतर प्रकारची कृषी गुंतवणूक अथवा भांडवली आदान खरेदी केलेली नाही असे दिसून येते. याचाच अर्थ असा निघतो की, प्रकल्पबाधीत कुटुंबांची कृषी गुंतवणूक अत्यल्प प्रमाणात असल्याचे दिसून येते.

**तक्ता ४.११ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाकडील पशुधन मालकीचे विवरण**

| पशुधन | टक्केवारी |
|---|---|
| **आहे** | ५१.८५ |
| **नाही** | ४६.३० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण


४.८ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाकडील पशुधन मालकीचे विवरण टक्केवारी




**तक्ता ४.१२ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे पशुधन मालकीचे प्रकारानुसार विवरण**

| पशुधन | टक्केवारी |
|---|---|
| **गाय** | ६५.५२ |
| **म्हैस** | ३४.४८ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण





एकूणपैकी ५१.८५ टक्के प्रकल्पबाधीतांकडे पशुधन आहे तर उर्वरित ४६.३० टक्के प्रकल्पबाधीतांकडे स्वत:चे पशुधन नाही असे दिसून आले. यापैकी ६५.३२ टक्के गायी व ३४.४८ टक्के म्हैस असे प्रमाण येते. याचाच अर्थ असा की, एकूणपैकी ४६.३० टक्के प्रकल्पबाधीत कुटुंबांना शेतीव्यतिरिक्त उत्पन्नाची इतर साधने उपलब्ध नाहीत अथवा नियमित उत्पन्न प्राप्त होवू शकेल असा दुग्ध व्यवसायासारखा व्यवसाय उपलब्ध नाही. परिणामे बहुतांश कुटुंबांचा उदरनिर्वाह व गुजराणीचा एकमेव व्यवसाय हा शेती व्यवसाय आहे असे दिसून येते. म्हणजेच प्रकल्पबाधीतांना जर त्यांच्या प्रकल्पबाधीत शेतजमिनीचा योग्य मोबदला मिहाला नाही तर त्यांच्या उदरनिर्वाहाचेच नुकसान संभवते.

**तक्ता ४.१३ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे कर्जविषयक विवरण**

| कर्ज | टक्केवारी |
|---|---|
| **आहे** | ६४.८१ |
| **नाही** | ३५.१९ |


संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण




## तक्ता ४.१४ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे कर्जस्त्रोतान्वये विवरण

| कोठुन घेतले | टक्केवारी |
|---|---|
| **नातेवाईक/मित्र** | ५.७१ |
| **बँक** | ३४.२९ |
| **सोसायटी** | ५७.१४ |
| **बचत गट** | २.८६ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण



प्रकल्पबाधीत शेतकरी कुटुंबांची कर्जविषयक चौकशी केली असता असे निदर्शनास येते की, एकूण प्रकल्पबाधीत कुटुंबापैकी ६४.८१ टक्के कुटुंबानी विविध कारणांसाठी कर्ज घेतले होते. मात्र ३५.१९ टक्के कुटुंबानी कोणतेही कर्ज घेतलेले नाही असे दिसून येते. प्रकल्पबाधीत कुटुंबांच्या कर्ज स्त्रोतांचे संस्थात्मक व बिगर संस्थात्मक असे वर्गीकरण करता असे निदर्शनास येते की, एकूणपैकी ९४.२९ टक्के कर्जदार कुटुंबांची कर्जे संस्थात्मक आहेत ती अनुक्रमे बँक (३४.२९ टक्के), सहकारी सोसायटी (५७.१४ टक्के) व बचतगट (२.८६ टक्के) तर फक्त ५.७१ टक्के कर्जे बिगर संस्थात्मक खाजगी मार्गांद्वारा घेतली असल्याची दिसून येतात.

**तक्ता ४.१५ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबातील मुलांचे तांत्रिक शिक्षणानुसार विवरण**

| तांत्रिक शिक्षण | टक्केवारी |
|---|---|
| **आहे** | १४.८१ |
| **नाही** | ८१.४८ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

**तक्ता ४.१६ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबातील शिक्षण सोडण्याचे प्रमाण**

| अर्ध्यावर शाळा सोडलेले | टक्केवारी |
|---|---|
| **आहे** | २६.५३ |
| **नाही** | ७३.४७ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

प्रकल्पबाधीत कुटुंबातील तरूण मुला-मुलींच्या तांत्रिक शिक्षणविषयक चौकशीअंती असाच निष्कर्ष मिळतो की, एकूण शिक्षित तरूणांपैकी मात्र १४.८१ टक्के तरूणांनी तांत्रिक शिक्षण घेतलेले आहे. मात्र यापैकी ८१.४८ टक्के तरूणांनी तांत्रिक ऐवजी इतर परंपरागत शिक्षण घेतले आहे. परिणामे अशा प्राथमिक माहितीतून असाच निष्कर्ष मिळतो की, प्रकल्पबाधीत बहुतांश तरूणवर्ग रोजगारासाठी शेती व्यवसायावरच निर्भर

असल्याने कोणत्याही सार्वजनिक प्रकल्पाने अशा लोकांची कृशी जमिन बाधीत होणार असेल तर त्याचा मोबदला व पर्यायी जमिन अथवा पुनर्वसनाची व्यवस्था नीटपणे पार पाडणे आवश्यक आहे. उपरोक्त नमूद तक्ता क्रमांक १६ मधील सर्वेक्षणप्राप्त आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला तर असे दिसून येते की, प्रकल्पबाधीत कुटुंबातील बहुतांश मुले-मुली ८१.४८ टक्के आपले शिक्षण अर्ध्यावर न सोडता पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. परंतु १४.८१ टक्के मुलांना मात्र कौटुंबिक कारणे अथवा इतर अडचणींमुळे आपले शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागले आहे असा निष्कर्ष मिळतो. याचाच अर्थ अध्यावर अथवा मध्यावर शिक्षण सोडणारांची रोजगार निर्भरता कृषीवरच अवलंबून आहे.

**तक्ता ४.१७ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाचे हंगामात स्थलांतरीत मजुरीवरून विवरण**

| हंगामात स्थलांतरीत मजुरी करता | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | १०.०० |
| **नाही** | ९०.०० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

**तक्ता ४.१८ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबातील महिला व पुरुषांचे हंगामी रोजगार स्थलांतर**

| हंगामात स्थलांतरीत मुजरी करता | टक्केवारी |
|---|---|
| **पुरुष** | ६.२५ |
| **स्त्री** | ९३.७५ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण


उपरोल्लेखित तक्ता क्रमांक १७ व १८ मधील सर्वेक्षण प्राप्त आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकता प्रकल्पबाधीतांचे हंगामी रोजगाराकरीताचे स्थलांतर समजण्यास मदत होते. प्रकल्प भागातील कृषी क्षेत्र बऱ्यापैकी विकसित व शाश्वत पाणीपुरवठ्याखाली असल्यामुळे बहुतांश प्रकल्पबाधीत व इतरही लोकांना स्थानिक पातळीवरच रोजगार निर्माण होण्यात

अडचणी येत नाहीत. त्यामुळे एकूण प्रकल्पबाधीत कुटुंबापैकी १०.०० टक्के कुटुंबे सोडता इतर ९०.०० टक्के कुटुंबांना हंगामी स्वरूपाच्या रोजगारासाठी स्थलांतर करण्याची आवश्यकता भासत नाही. विशेष म्हणजे प्रकल्पबाधीत कुटुंबातून रोजगारासाठी स्थलांतर करणारांत पुरुषांपेक्षा (६.२५ टक्के) स्त्रियांचे प्रमाण (९३.७५ टक्के) अधिक आहे. हे स्थलांतर प्रामुख्याने नजिकच्या औद्योगिक क्षेत्रात होत असल्याचे दिसून आले.

**तक्ता ४.१९ : रूकडी रस्ता–पूल प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या पिकपद्धतीविषयी विवरण**

| पिकाचे नाव | टक्केवारी |
|---|---|
| **ऊस** | ८६.०५ |
| **भात** | ६.९८ |
| **सोयाबीन** | ४.६५ |
| **भुईमूग** | २.३३ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण





प्रकल्पबाधीत क्षेत्र पंचगंगा नदीच्या पाणीपुरवठ्याच्या भागात येत असल्याने वर्षभर पाण्याचा पुरवठा असतो. त्यामुळे प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांच्या पिकपद्धतीवर दृष्टिक्षेप टाकता असे दिसून येते की जवळजवळ सर्व शेतकरी व्यापारी पिकांचे उत्पादन घेतात. यात प्रामुख्याने ऊस (८६.०६ टक्के), भात (६.९८ टक्के), सोयाबीन (४.६५ टक्के) व

भुईमूग (२.३३ टक्के) अशा व्यापारी व पाणीपुरवठा निर्भर पिकांचा समावेश होतो. ऊसाचे पिक अथवा इतर पिकांचे उत्पादन देणारी पाण्याचा भरपूर पुरवठा असणारी शेती हे प्रस्तुत प्रकल्पबाधीत क्षेत्राचे विशेष वैशिष्ट्य मानावे लागेल. अशा प्रकारची व्यापारी पीकक्षम शेती असल्यामुळे या भागातील शेतीची प्रती एकर किंमतही जास्त आहे. परिणामे प्रस्तुत प्रकल्पबाधीतांना त्यांच्या प्रकल्पबाधीत शेतीचा मोबदला देताना येथील सरकारी प्रचलित दर नव्हे तर बाजारभावानुसार विचार करूनच मोबदला निश्चित करणे आवश्यक आहे.

**तक्ता ४.२० : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत कुटुंबांच्या कृषी पर्यायी रोजगारविषयक विवरण**

| इतर मार्गापासून उत्पन्न | टक्केवारी |
|---|---|
| **नाही** | ५७.१४ |
| **नोकरी** | २८.५७ |
| **व्यवसाय** | ८.१६ |
| **पेन्शन** | ४.०८ |
| **अन्य** | २.०४ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण



बहुतांश प्रकल्पबाधीतांना (५७.१४ टक्के) शेती व्यतिरिक्त रोजगार अथवा मिळकतीचे इतर कोणतही मार्ग उपलब्ध नाहीत. परंतु २८.५७ टक्के प्रकल्पबाधीत कुटुंबांतील एखाद-दुसरा सदस्य नोकरीत असल्याची माहिती मिळते तर ८.१६ टक्के प्रकल्पबाधीत कुटुंबात काही छोटे-मोठे व्यवसाय सुरू आहेत. ४.०८ टक्के प्रकल्पबाधीत कुटुंबांना निवृत्तीवेतनाचा आधार आहे. यावरूनही अशा निष्कर्षाप्रत पोहोचता येते की, बहुतांश प्रकल्पबाधीत त्यांच्या उदरनिर्वाहासाठी कृषीनिर्भर आहेत.

**तक्ता ४.२१ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांच्या जमिन बाधनविषयक विवरण**

| जमिन प्रकल्पामध्ये गेली आहे का? | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | १००.०० |
| **नाही** | ०.०० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

**तक्ता ४.२२ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांवरील जमिन देण्याविषयीच्या सक्ती/दबावविषयक विवरण**


| कोणी दबाव आणला का? | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | ४.२६ |
| **नाही** | ९५.७४ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांपैकी बहुतांश शेतकऱ्यांनी (९५.७४ टक्के) प्रस्तुत प्रकल्पाकरीता जमिन देण्यासाठी कोणीही दबाव आणला नाही असे नमूद केले असले तरीही ४.२६ टक्के शेतकऱ्यांना असे वाटते की प्रकल्पासाठी जमिन देणेकामी त्यांच्यावर दबाव आला होता. एकंदरीत काय तर जर बहुतांश (९५.७४ टक्के) शेतकरी प्रकल्पाकरीता कोणत्याही दबावाव्यतिरिक्त आपले स्वत:चे उदरनिर्वाहाचे साधन असलेली कृषी जमिन देवून पायाभूत सुविधा प्रकल्प व एकंदरीतच आर्थिक विकास धोरणांस योगदान करत असतील तर त्यांच्या प्रकल्पबाधीत जमिनीस योग्य मोबदला मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

**तक्ता ४.२३ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांना प्रकल्पबाधन क्षेत्राच्या मोबदल्याविषयक विवरण**

| किंमत समाधानकारक आहे का? | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | ४.८८ |
| **नाही** | ६३.४१ |
| **किंमतीबाबत अस्पष्टता** | ३१.७१ |





प्रकल्पबाधीतांना त्यांच्या प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्यात किती व कसा मोबदला मिळणार याची त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याकडून काहीही माहिती मिळालेली नाही. परंतु ऐकीव माहितीच्या आधारे त्यांनी आमच्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. प्रकल्पबाधीत जमिनीचा किती मोबदला मिळणार आहे हे त्यांना माहित नसले तरीही त्यांना समाधानकारक मोबदला मिळणार नाही अशीच बहुतांश प्रकल्पबाधीतांची (६३.४१ टक्के) धारणा आहे. मिळणाऱ्या मोबदल्याविषयी अस्पष्टता असणाऱ्या प्रकल्पबाधीतांचे प्रमाणही (३१.७१ टक्के) चिंताजनकरित्या जास्त आहे. यावरून असेच अनुमान निघते की, एकूण प्रकल्पबाधीतांपैकी ९५.१२ टक्के (६३.४१ टक्के + ३१.७१ टक्के) प्रकल्पबाधीत आपल्या प्रकल्पबाधीत जमिनीकरीता मिळणाऱ्या मोबदल्याविषयी असमाधानकारक आहेत. शेतकरीवर्गाने अनेक प्रकल्पांना जमिनी देवून प्रसंगी आपले

उदरनिर्वाहाचे साधन गमावले आणि देशाच्या विकासकामात योगदान दिले. परंतु त्याच्या बदल्यात ना त्यांना योग्य मोबदला मिळाला ना त्यांचे वेळेवर योग्य पुनर्वसन झाले असाच इतिहास असल्याचे दिसून येते.

**तक्ता ४.२४ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांच्याकडून प्रकल्पाविरोधाचे स्वरूप**

| विरोध कसा दर्शवाल? | टक्केवारी |
|---|---|
| **विरोधी आंदोलन** | १५.०० |
| **जमिनीचे सौदे करताना ताठर भूमिका** | २.५० |
| **समितीच्या माध्यमातून** | २.५० |
| **विरोध नाही** | ८०.०० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण





उपरोल्लेखित तक्त्यातील (तक्ता क्रमांक ५.२४) आकडेवारी याअगोदरच्या विश्लेषणास पुष्टी देते. (तक्ता क्रमांक २३) कारण एकूणपैकी जास्तीत जास्त ८० टक्के प्रकल्पबाधीतांचा प्रस्तुत प्रकल्पास विरोध नाही. एकूणपैकी १५ टक्के प्रकल्पबाधीतांनी प्रकल्पविरोधी आंदोलन करून आपला विरोध दर्शविला असला तरी तो विरोध प्रामुख्याने प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्याशी निगडित आहे. त्यांचाही प्रकल्पाच्या कामास विरोध नाही असेच प्रत्यक्ष क्षेत्र पाहणीतून दिसून आले. उर्वरित प्रत्येकी २.५०

टक्के प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांनी जमिन सौदे करताना ताठर भूमिका व समितीच्या माध्यमातून विरोध केला असे सांगितले. अर्थात हा विरोधही प्रकल्पास नसून प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्यास आहे हे नमूद करणे अत्यंत आवश्यक आहे. तक्ता क्रमांक २४ मधील आकडेवारीच्या विवरणावरून हे स्पष्टपणे जाणवते की एकूण सर्व १०० टक्के प्रकल्पबाधीतांचा प्रकल्पास अजिबात विरोध नसून प्रकल्पबाधीत जमिनीचा मोबदला व सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांच्या प्रकल्पबाधीतांप्रती असलेल्या वर्तणुकीस विरोध आहे असेच सापनि अभ्यासगटास क्षेत्र पाहणीच्या प्रत्यक्ष अनुभवावरून दिसून आले.

**तक्ता ४.२५ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांच्या प्रमुख मागण्या**

| प्रमुख मागण्या | टक्केवारी |
|---|---|
| **जमिनीच्या बदल्यात जमिन** | ४६.६७ |
| **बाजारभावापेक्षा जास्त दर** | ४२.२२ |
| **नव्या जागी गावाचे पुनर्वसन** | ०.०० |
| **प्रकल्पग्रस्तास नोकरी** | ४.४४ |
| **जमिन व घराची किंमत बाजारभावाप्रमाणे** | २.२२ |
| **अन्य** | ४.४४ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण




बहुतांशी प्रकल्पबाधीतांना (४६.६७ टक्के) त्यांच्या प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्यात जमिन हवी आहे. तर जवळजवळ तेवढ्याच (४२.२२ टक्के) प्रकल्पबाधीतांना बाजारभावापेक्षा अधिक दाराने त्यांच्या जमिनीचा मोबदला हवा आहे. काही प्रकल्पबाधीतांनी (४.४४ टक्के) कुटुंबातील किमान एका सदस्यास नोकरी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे तर २.२४ टक्के प्रकल्पबाधीतांना त्यांचे प्रकल्पबाधीत घर व जमिनीकरीता किमान बाजारभावाप्रमाणे किंमत मिळावी अशी अपेक्षा आहे. विशेष म्हणजे प्रस्तुत रस्ता–पूल प्रकल्पाचा बहुतांश भाग ऊस बागायतीचा व बारमाही पाणीपुरवठ्याचा असल्यामुळे या भागातील जमिनींच्या किंमती भरपूर आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या प्रक्लपबाधीत जमिनीस मोबदला देताना या बाबीचा विचार होणे आवश्यक आहे.

**तक्ता ४.२६ : रूकडी रस्ता–पूल प्रकल्पबाधीतांचे प्रकल्पाविषयीचे मत**

| प्रकल्पाचा फायदा होईल का? | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | ५१.२२ |
| **नाही** | ४८.७८ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

बहुतांशी प्रकल्पबाधीत (५१.२२ टक्के) शेतकरी त्यांना प्रस्तुत प्रकल्पाचा लाभ होईल असे मान्य करतात. परंतु ४८.७४ टक्के प्रकल्पबाधीतांना प्रस्तुत प्रकल्पाचा कोणताही लाभ संभवत नाही. कारण हे शेतकरी प्रस्तावित रस्ता व पुलापासून दूर राहतात आणि त्यांची शेतजमिन मात्र प्रकल्पक्षेत्रात जात असल्याने त्यांचे नुकसान संभावते म्हणून प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्याबद्दल ते आग्रही असल्याचे दिसून येते.

**तक्ता ४.२७ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांच्या उर्वरित जमिनीच्या अपेक्षित बाजारमूल्याविषयी प्रकल्पबाधीतांचा अंदाज**

| जमिनीला योग्य किंमत मिळेल | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | ३४.८८ |
| **नाही** | ११.६३ |
| **सांगता येत नाही** | ५३.४९ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

बहुतांश प्रकल्पबाधीत शेतकरी (६५.१२ टक्के) प्रकल्पामुळे भविष्यात त्यांच्या उर्वरित जमिनीस अधिक किंमत येईल काय याबाबत साशंक असल्याचे दिसून आले. मिळणार नाही (११.६३ टक्के) व संदिग्ध (५३.४९ टक्के) परंतु काही (३४.८८ टक्के) प्रकल्पबाधीतांना निश्चितपणे असे वाटते की प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या उर्वरित जमिनीस अधिक भाव मिळू शकतो. अर्थात याबाबत काहीही आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण अशा प्रकारचा कोणताही पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्याचे लाभ प्रकल्पाच्या आसपासच्या जमिनींच्या किंमती वाढल्यामुळे होतच असतात. अशा प्रक्रियेस मूल्य भांडवलीकरणाची (Value Capitalisation) प्रक्रिया असे संबोधले जाते. असा अनुभव इतर कोणत्याही पायाभूत सुविधा प्रकल्पपूर्तीमुळे येत असतोच.

**तक्ता ४.२८ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांचे प्रकल्पोपरांत रोजगारविषयक अंदाज**

| रोजगार मिळेल | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | ३१.७१ |
| **नाही** | १२.२० |
| **सांगता येत नाही** | ५६.१० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

बहुतांशी प्रकल्पबाधीत (६८.३० टक्के) प्रकल्पामुळे निर्माण होवू शकणाऱ्या रोजगार संधीबाबत साशंक आहेत. अर्थात प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्पामुळे त्यांना रोजगाराच्या संधीही संभवत नाहीत. त्यामुळेच एकूण प्रकल्पबाधीतांपैकी ११.६३ टक्के प्रकल्पबाधीत शेतकरी प्रस्तुत प्रकल्पामुळे रोजगार मिळणार नाही या मतावर ठाम आहेत तर ५६.१० टक्के प्रकल्पबाधीत याबाबत साशंक असल्याचे दिसून येते. परंतु ३१.७१ टक्के प्रकल्पबाधीत प्रकल्पोपरांत रोजगार संधीत वाढ होवू शकते अशी अपेक्षा बाळगताना दिसून येतात.

**तक्ता ४.२९ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांचे प्रकल्पोपरांत शेती व्यवसायाविषयीचे व्यवसाय चालू ठेवण्याविषयीचे मत**

| शेती पुढे चालू ठेवणार का? | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | ८१.२५ |
| **नाही** | १८.७५ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

बहुतांशी प्रकल्पबाधीत शेतकरी आपला शेती व्यवसाय अविरतपणे चालू ठेवू इच्छितात (८१.२५ टक्के) याचे कारण असे की शेती व्यवसायाचे त्यांना ज्ञान आहे (२०.५१ टक्के). तसेच शेती व्यवसाय हा परंपरेने (७९.४९ टक्के) आणि पिढीजात व्यवसाय असल्यामुळे या व्यवसायाचे त्यांना ज्ञान तर आहेच परंतु शेती व्यवसायाबाबत प्रकल्पबाधीत कुटुंबांना आवड व आकर्षणही असल्याचे सापनि अभ्यासगटाचे प्रत्यक्ष

पाहणीचेवेळी लक्षात आले. एकूणपैकी काही थोड्या (१८.२५ टक्के) प्रकल्पबाधीतांना भविष्यात शेती व्यवसाय चालू ठेवण्यात फारसे स्वारस्थ नाही असे दिसून आले. याचे कारण असे की अशा प्रकल्पबाघीत कुटुंबाकडे शेती करण्यासाठी घरात व्यक्ती नाहीत.

यापूर्वीच म्हणजे (२००३ मध्ये) भारतातील ४१ टक्के शेतकऱ्यांनी त्यांना शेतीव्यतिरिक्त इतर व्यवसाय करण्याची संधी मिळाली तर शेती व्यवसाय सोडण्याची तयारी दर्शविली होतीच (NSSO, 2003). याचे प्रमुख कारण शेती व्यवसाय अकिफायतशीर झाला आहे. असाच काहीसा अनुभव सापनि अभ्यासगटाला रूकडी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करतानाही आला आहे. तक्ता क्रमांक २९ मध्ये एकूण प्रकल्पग्रस्तांपैकी १८.७५ टक्के प्रकल्पग्रस्त शेती व्यवसाय करू इच्छित नाहीत असे दिसून आले.

**तक्ता ४.३० : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांकडून शेती व्यवसाय बंद करण्याविषयीची कारणमिमांसा**

| नाही असल्यास कारण | टक्केवारी |
|---|---|
| तोट्यातला व्यवसाय | ५५.५६ |
| कष्टाचे काम | ११.११ |
| अन्य | ३३.३३ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

उपरोक्त तक्ता क्रमांक ३० मधील आकडेवारीवरून आपणास हे प्रकल्पग्रस्त शेती का करू इच्छित नाहीत याची कारणमिमांसा मिळते. शेती व्यवसाय त्यागू इच्छिणाऱ्या एकूणपैकी ५५.५६ टक्के प्रकल्पगस्तांना शेती व्यवसाय परवडत नाही असे वाटत असल्यामुळे भविष्यात शेती व्यवसाय चालू ठेवण्याची इच्छा नाही तर उर्वरित ११.११ टक्के प्रकल्पग्रस्तांना कष्टाच्या मानाने मिळणारी मिळकत कमी आहे. असे असल्याने शेती व्यवसाय करण्याची इच्छा नाही तर उर्वरित ३३.३३ टक्के प्रकल्पग्रस्त इतर अन्य कारणांमुळे शेती व्यवसाय चालू ठेवू इच्छित नाहीत. एकंदरीत काय तर शेती व्यवसाय

चालू ठेवणे बहुतांश प्रकल्पग्रस्तांना नकोसे झाले असल्याने त्यांना किमानपक्षी त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळणे अत्यंत आवश्यक आहे असे आमचे मत पडते.

**तक्ता ४.३१ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्याचा प्रकल्पबाधीतांकडून शेतजमिन खरेदी करण्याविषयक विचार**

| मोबदल्यातून जमिनी खरेदी करणार का? | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | ५६.५२ |
| **नाही** | ४३.४८ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

**तक्ता ४.३२ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत शेतजमिन खरेदी करण्याविषयीची कारणमिमांसा**

| होय असल्यास कारण | टक्केवारी |
|---|---|
| **शेती हाच व्यवसाय करणार** | ८७.५ |
| **जमिन खरेदी फायदेशीर असते** | १२.५ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

जास्तीत जास्त (५६.५२ टक्के) प्रकल्पग्रस्त प्रकल्पबाधनाच्या मोबदल्यातून पुन्हा शेती खरेदी करू इच्छितात. याचे एकमेव कारण म्हणजे (८७.५० टक्के) बहुतांश प्रकल्पबाधीतांना शेती व्यवसाय करण्याची इच्छा आहे असेच दिसून येते. तसेच जमिन खरेदी करणे फायदेशीर असते (१२.५० टक्के). असेही काही प्रकल्पग्रस्तांना वाटते व तसा विचार करणे निश्चितच योग्य आहे. ४३.४८ टक्के प्रकल्पग्रस्त मात्र प्रकल्पबाधन मोबदल्यातून शेती खरेदी करणार नाहीत. अर्थात याची कारणमिमांसाही त्यांनी केली आहे व ती आपणास निम्नउर्धृत तक्त्याद्वारा (तक्ता क्रमांक ३३) सहज लक्षात येते.

**तक्ता क्रमांक ४.३३ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत शेतजमिन खरेदी न करण्याविषयीची कारणमिमांसा**

| नाही असल्यास कारण | टक्केवारी |
|---|---|
| **पुन्हा शेतीकडे वळणार नाही** | ४१.६७ |
| **मिहालेल्या रक्कमेपेक्षा जमिनीची किंमत जास्त** | ५०.०० |
| **मुलांच्या शिक्षण व लग्नासाठी रक्कम राखून ठेवणार** | ५.३३ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

राष्ट्रीय नमुना पाहणी २००३ च्या सर्वेक्षणाप्रमाणे अथवा उपरोल्लेखित तक्त्यात (तक्ता क्रमांक २९) नमूद केल्याप्रमाणे अनेक प्रकल्पबाधीत (४१.६७ टक्के) पुन्हा प्रकल्पबाधनोपरांत शेती करू इच्छित नाहीत. यामुळे प्रकल्पबाधन बदल्यात मिळालेल्या पैशातून नवीन शेतजमिन खरेदी करू इच्छित नाहीत. प्रकल्पबाधन क्षेत्र बारमाही पाणीपुरवठ्याचे क्षेत्र असल्यामुळे नगदी पिकरचनेस भरपूर वाव आहे. त्यामुळे या भागातील शेतजमिनींचे बाजारभाव व सरकारी किंमत यात प्रचंड तफावत आहे. तसेच खरेदी-विक्री दस्त दर (Stamp Duty) खरेदी विक्रीच्या किंमतीवर आधारित असल्यामुळे प्रत्यक्ष खरेदी विक्री किंमत वास्तव सौदा अथवा व्यवहारापेक्षा कमी दाखवण्याची प्रवृत्ती असते. अर्थात जमिनीची बाजार किंमत ठरविताना ज्या दराने खरेदी विक्री व्यवहार झालेले असतात अशाच दरास कायदेशीर मान्यता व बाजार किंमत मानण्याचे धोरण असल्याने अशा दस्त बाजार किंमती जमिनींच्या वास्तव किंमतीपेक्षा कमीच असणार यात आश्चर्य नसावे. परंतु जेव्हा अशा भागातील जमिनी एखाद्या सरकारी प्रकल्पाकरीता अधिग्रहित केल्या जातात तेव्हा प्रकल्पबाधीत जमिनींचा मोबदला निश्चित करताना अलिकडच्या/नजिकच्या भूतकाळातील दस्त नोंदणीकृत किंमतींचा आधार घेतला जातो. आणि उपरोल्लेख केल्याप्रमाणे दस्त नोंदणीच्या किंमती दस्त कर टाळण्याकरीता (Stamp Duty) कमी दर्शविलेल्या असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनीस सरकारकडून कमी मोबदला मिळण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे वास्तव बाजार किंमती जास्त व अधिग्रहण मोबदला कमी अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे मिळालेल्या

मोबदल्यातून प्रकल्पग्रस्तांना नवीन जमिन खरेदी करणे शक्य होत नाही. त्यामुळे जे ४३.४८ टक्के प्रकल्पग्रस्त तक्ता क्रमांक ५.३१ प्रकल्पबाधन मोबदल्यात नवीन जमिन खरेदी करू इच्छित नाहीत त्यापैकी ५० टक्के प्रकल्पग्रस्तांनी प्रक्ल्पबाधन मोबदला कमी व जमिनींचा वास्तव बाजारभाव जास्त या वास्तवाकडे अंगुलीनिर्देश केला आहे. त्यामुळे प्रकल्पबाधन क्षेत्रातील जमिनींचा वास्तव बाजारभाव शोधून त्याप्रमाणेच अधिग्रहण मोबदला देणे आवश्यक आहे. अर्थात काही प्रकल्पबाधीत शेतकरी (८.३३ टक्के) असेही आहेत की ज्यांना मिळालेला अधिग्रहण मोबदला मुलांचे शिक्षण व लग्नाकरीता (विशेषत: मुलींच्या) राखून ठेवणे आवश्यक वाटते. म्हणजेच सार्वजनिक प्रकल्पबाधीतांचे पुनर्वसन करताना प्रकल्पबाधीतांच्या मुला-मुलींच्या पर्यायी रोजगाराचाही विचार होणे आवश्यक आहेच. असा विचार मात्र कोणतेही सरकारी प्रकल्प अंमलबजावणी खाते करताना दिसत नाही.

**तक्ता ४.३४ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्यात अपेक्षित शेतजमिन खरेदीविषयक प्रकल्पबाधीतांचे अंदाज**

| मिळालेल्या पैशातून जमिन | टक्केवारी |
|---|---|
| **तेवढीच जमिन** | १७.९५ |
| **त्याहून जास्त** | ५.१३ |
| **त्याहून कमी** | ५१.२८ |
| **सांगता येत नाही** | २५.६४ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

अर्ध्याहून अधिक (५१.२८ टक्के) प्रकल्पबाधीतांना असे वाटते की; प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्यात त्यांना अधिग्रहित जमिनीइतकी जमिन पुन्हा खरेदी करणे शक्य होणार नाही. याची कारणमिमांसा उपरोल्लेखित तक्त्यातील आकडेवारीवरून आपल्या लक्षात येतेच (तक्ता क्रमांक ३३). २५.६४ टक्के प्रकल्पबाधीत शेतकरी त्यांना अधिग्रहण मोबदल्यातून किती जमिन खरेदी करता येईल याविषयी अनभिज्ञ आहेत. तर ५.१३ टक्के

प्रकल्पग्रस्तांना मिळणाऱ्या अधिग्रहण मोबदल्यातून अधिग्रहित जमिनीपेक्षा अधिक जमिन खरेदी करता येवू शकते असे वाटते आहे. १७.९५ टक्के प्रकल्पबाधीतांना मात्र पुन्हा प्रकल्पबाधीत जमिनीइतकी जमिन खरेदी करता येईल असा आत्मविश्वास वाटतो. त्यावरून एक महत्त्वाचे अनुमान निघते व ते म्हणजे प्रकल्पबाधीत शेतकरी एकतर त्यांना मिळणाऱ्या अधिग्रहण मोबदल्याविषयी अनभिज्ञ आहेत अथवा अधिग्रहण मोबदल्याच्या सहाय्याने प्रकल्पअधिग्रहित जमिनीच्या तुलनेत कमी जमिन खरेदी करू शकतात याबद्दल नक्की काहीच अंदाज बांधू शकत नाहीत. पर्यायाने प्रकल्पोपरांत स्वत:च्या भविष्याबद्दल साशंक आहेत.

### तक्ता ४.३५ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पबाधीतांचे मत

| प्रकल्प कामाबाबत समाधानी | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | ६१.३६ |
| **नाही** | ३८.६४ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

बहुतांश प्रकल्पबाधीत शेतकरी (६१.३६ टक्के) प्रकल्पाविषयी समाधानी आहेत असे सांगतात तर उर्वरित (३८.६४ टक्के) शेतकरी असमाधानी असल्याचे दिसून आले. परंतु प्रत्यक्ष क्षेत्रभेटीतून असेच दिसून आले की प्रकल्पाविषयी समाधानी व असमाधानी असे दोन्हीही गटातील शेतकरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांबाबत मात्र असमाधानी असल्याचे निदर्शनास आले. याचे प्रमुख कारण असे की, प्रकल्प अधिकाऱ्यांकडून प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही अशी त्यांची प्रमुख तक्रार आहे. तसेच अधिग्रहित जमिन मोबदल्याविषयी या अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना विश्वासात घेवून काहीच माहिती दिली नाही अशी परिस्थिती निदर्शनास येते.

**तक्ता ४.३६ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पोपरांत प्रकल्पबाधीतांचे रोजगारविषयक अंदाज**

| रोजगाराच्या संधी | टक्केवारी |
|---|---|
| **नाही** | १०.०० |
| **थेट रोजगार** | ५.०० |
| **प्रत्यक्ष रोजगार** | १५.०० |
| **सांगता येत नाही** | ७०.०० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

बहुतांश प्रकल्पग्रस्तांना (७० टक्के) रूकडी प्रकल्पोपरांत त्यांच्या रोजगार संधीत काय फरक पडेल याविषयी अंदाज नाही. अर्थात १० टक्के प्रकल्पग्रस्तांना खात्रीने वाटते की, प्रकल्पोपरांत त्यांच्या रोजगार संधीत काहीच फरक पडणार नाही. अथवा या प्रकल्पामुळे नवीन रोजगार संधी उपलब्ध होण्याची सुतराम शक्यता नाही असेच त्यांना वाटते. थोड्या प्रकल्पग्रस्तांना (२० टक्के) मात्र रूकडी रस्ता-पूल प्रकल्पामुळे रोजगार संधी निर्माण होवून उत्पन्नाचे नवीन मार्ग निर्माण होतील असे वाटते. याचे कारण प्रस्तुत रस्त्यात जमिन जावून संभाव्य नवीन रस्त्याच्या बाजूला त्यांची जमिन शिल्लक राहते. त्यामुळे संभाव्य रस्त्याच्या बाजूला त्यांना शिल्लक जमिनीचा वापर करता येईल असे वाटते (५ टक्के + १५ टक्के). पायाभूत सुविधा प्रकल्पामुळे रोजगार संधीत वाढ होणे अपेक्षित असतेच. परंतु सर्वच प्रकल्पांबाबत असे घडतेच असे नाही. याचे कारण असे की प्रकल्पबाधीतांची प्रकल्पाचे लाभ घेण्याची क्षमता आहे किंवा नाही यावर ते निर्भर करते असे नव्हे तर संबंधित प्रकल्पामुळे रोजगार व उत्पन्नाच्या संधी निर्माण होवू शकतात काय यावर ते निर्भर असते. आणि जर एखाद्या प्रकल्पातील प्रकल्पबाधीतांना संबंधित प्रकल्पाचे लाभ आपोआप होणार नसतील तर मग सरकारने किंवा प्रकल्प विभागाने प्रतिगामी-अवगामी समावेशी प्रकल्पाच्या दिशेने विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. असे उदाहरण नवीन आंध्रप्रदेश सरकारने अमरावती येथे नवीन राज्य राजधानीकरीता जमिन अधिग्रहण करताना जी आदर्श निती वापरली त्याचे देता येवू शकेल.

**तक्ता ४.३७ : रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाचे अपेक्षित परिणाम**

| अपेक्षित परिणाम | टक्केवारी |
|---|---|
| **गरीबांकडे पैसा जाईल** | ६.१२ |
| **सामाजिक नातेसंबंध सुधारतील** | १८.३७ |
| **शेतीतील नवी तंत्रे वापरता येतील** | १०.२० |
| **श्रीमंत अधिक श्रीमंत होतील** | ६.१२ |
| **गटबाजी निर्माण होईल** | ४.०८ |
| **शेती करण्याच्या जुन्या पद्धती मोडून पडतील** | ६.१२ |
| **सांगता येत नाही** | ४८.९८ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाच्या प्रकल्पोपरांत संभाव्य लाभांचा विचार केला तर जवळजवळ निम्मे (४८.९८ टक्के) प्रकल्पबाधीत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते. अर्थात असा निष्कर्ष मिळणे काही आश्चर्य नाही. कारण प्रकल्प विभाग अधिकाऱ्यांनी प्रकल्पबाधीतांना प्रकल्पाविषयी अद्याप काहीच माहिती दिलेली नाही अथवा त्यांना विश्वासात घेतलेले नाही. दळणवळणाच्या सुविधा निर्माण होवून शेतीत नवीन तंत्र वापरता येईल असेही काही प्रकल्पबाधीतांना वाटते (१०.२० टक्के). परंतु याबाबतही त्यांना निश्चित अंदाज बांधता येत नाही असेच आम्हाला त्यांच्याबरोबर विशेष गटचर्चा करता लक्षात आले. ज्या शेतकऱ्यांची संभाव्य प्रकल्प/रस्त्यालगत जमिन आहे ते अधिक श्रीमंत होतील असेही काही (६.१२ टक्के) प्रकल्पग्रस्तांना वाटते व ते सत्यही आहेच यात काही शंका नसावी.

गरीब श्रीमंतातील दरी व गटबाजीची शक्यता (४.०८ टक्के) काही प्रकल्पग्रस्तांनी निसंकोचपणे व्यक्त केली. अर्थात असा अनुभव इतरही अनेक प्रकल्पांच्या बाबतीत दिसून आला आहेच. अर्थात काही प्रकल्पबाधीतांना (१८.३७ टक्के) सामाजिक नातेसंबंध सुधारतील असे वाटते. परंतु याची कारणे मात्र ते व्यक्त करू शकले नाहीत. नवीन रस्त्यामुळे दळणवळणाच्या सुविधा वाढून गरीब लोकांना काही व्यवसाय सुरू

करता येवून त्यांचे उत्पन्न वाढेल असेही काही (६.१२ टक्के) प्रकल्पग्रस्तांना वाटते. याचे कारण असे की नवीन रस्त्यालगत छोटे–मोठे व्यवसाय व व्यापारास चालना मिळू शकते असा त्यांचा अंदाज आहे. यावरून असे निदर्शनास येते की प्रत्येक प्रकल्पाबाबत प्रत्येकाचे मत वेगळे असल्याने अपेक्षित प्रतिगामी–अवगामी लाभाचे अंदाजही भिन्न दिसून येतात.

**तक्ता ४.३८ : रूकडी रस्ता–पूल प्रकल्पावरील रोजगार संधीविषयी प्रकल्पबाधीतांचे मत**

| रोजगार संधीविषयी मत | टक्केवारी |
|---|---|
| **होय** | १२.७७ |
| **नाही** | ८७.२३ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

प्रकल्पोपरांत रोजगार संधीचा विचार केला तर बहुतांश (८७.२३ टक्के) प्रकल्पबाधीत प्रस्तावित प्रकल्पामुळे रोजगार संधी निर्माण होणार नाहीत यावर ठाम आहेत तर अल्प (१२.७७ टक्के) प्रमाणातील प्रकल्पबाधीतांना प्रकल्पामुळे काही प्रमाणात रोजगार संधी निर्माण होतील असे वाटते. एकंदरीत काय तर ज्या प्रकल्पबाधीतांची प्रकल्पाव्यतिरिक्त प्रस्तावित रस्त्याच्या बाजूला काही जमिन शिल्लक राहते त्यांनाच काही प्रमाणात बिगरशेती व्यापार उदीम अथवा रोजगार संधीची अपेक्षा आहे. परंतु उर्वरित बहुतांश प्रकल्पबाधीत (८७.२३ टक्के) शेतकऱ्यांची जमिन प्रकल्पात जावूनही त्यांना प्रकल्पामुळे इतर काहीही रोजगारविषयक लाभ संभवत नाहीत. त्यामुळे अशा बहुतांश प्रकल्पबाधीतांना त्यांच्या जमिनीची वास्तव किंमत निश्चित करून त्याच्या चार पट मोबदला देणे आवश्यक आहे. अर्थात असे करताना नजिकच्या भूतकाळातील जमिन व्यवहारांच्या दस्त नोंदणी किंमतीचा आधार घेतला जावू नये. याची कारणमिमांसा आम्ही याअगोदर केलेलीच आहे.

## प्रकरण : ५

# निष्कर्ष व शिफारशी

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ ला जोडणारा २० किलोमिटरचा पक्का रस्ता कोल्हापूर जिल्ह्याच्या करवीर तालुक्यातील चिंचवाड व हातकणंगले तालुक्यातील रूकडी गावांना जोडून पुढे जावून राष्ट्रीय महामार्गास जावून मिळतो. प्रस्तुत पक्का रस्ता या गावांना जोडून त्यावरील वाहतूक सुकर व शक्य होण्याकरीता मौजे रूकडी, ता. हातकणंगले हद्दीत २०० मिटर लांबीचा एक मोठा पूल बांधी आवश्यक आहे. प्रस्तुत पुलाकरीता मौजे रूकडी येथील ७५ कृषी गटक्रमांकातून जमिन संपादित करणे आहे. परंतु प्रस्तुत शेतकऱ्यांचा जमिन अधिग्रहणास विरोध असल्यामुळे प्रस्तावित पुलाचे बांधकाम ठप्प झाले असून उपरोल्लेखित गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत राहिले आहे. प्रकल्प प्रलंबनाचे प्रमुख कारण प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांच्या त्यांच्या जमिन अधिग्रहणाच्या बदल्यात असलेल्या मागण्या पूर्ण न होणे हे आहे. त्यामुळे प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्पाच्या प्रलंबनाच्या कारणांचा मागोवा घेवून उभयपक्षी (प्रकल्पबाधीत सर्व शेतकरी व सार्वजनिक बांधकाम खाते) मान्य होवू शकेल असा परिस्थितीजन्य अभ्यासपूर्ण सापनि (Social Impact Analysis) अहवाल तयार करण्याचे काम शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल प्रामुख्याने प्राथमिक माहितीवर निर्भर असून याकामी प्रकल्पबाधीत कुटुंबांची आवश्यक तितक्या वेळा भेट घेवून प्रश्नावली व चर्चेच्या माध्यमातून प्राथमिक माहितीचे संकलन केले असल्याने प्रस्तुत सापनि अहवाल सत्यतेच्या निकषांवर पात्र ठरू शकतो अशाच प्रकारे तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तावित रूकडी रस्ता-पूल प्रकल्प व प्रामुख्याने मौजे रूकडी, ता. हातकणंगले पुलामुळे पुढे अनेक गावांना त्याचा लाभ होणार असून या सर्व गावांची मानवी, कृषी व व्यापारी वाहतूक प्रस्तावित पुलाच्या बांधकामावर निर्भर आहे. कारण या सर्व वाहतुकीकरीता सध्या मौजे रूकडी येथील एका साध्या बंधाऱ्यावरून (पुलावरून)

वाहतूक होत असल्याने ते अत्यंत धोकादाय असल्यामुळे प्रकल्पबाधीतांच्या जमिन त्यागाचा मोबदला देताना सार्वजनिक बांधकाम खात्याने व्यवस्थित विचार करून तसे प्रकल्पबाधीतांस कागदोपत्री आश्वस्त केले व अंमलबजावणीची तात्काळ तयारी दर्शविल्यास पूल बांधकाम प्रकल्प मार्गी लागू शकतो.

प्रकल्पबाधीतांस जमिन अधिग्रहणाबाबत व त्यांच्या मोबदल्यात मुख्यत्वे कागदोपत्री आश्वस्त करणे आवश्यक आहे असाच निष्कर्ष स्थळभेटीवरून निघतो. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ ला जोडणाऱ्या २० किलोमिटर लांबीच्या रस्त्याच्या कामाचे पूर्णत्व मौजे रूकडी, ता. हातकणंगले येथील पुलाच्या बांधकामावर निर्भर असून त्याकामी एकूण ७५ कृषी जमिन गटांतून जमिन अधिग्रहित करावी लागणार आहे. प्रस्तुत अधिग्रहणाच्या अभ्यासाकरीता प्राथमिक माहितीचे संकलन व क्षेत्रभेटीतून निम्नउल्लेखित बाबी निदर्शनास आल्या;

१. बहुतांश कुटुंबांचा उदरनिर्वाह व गुजराणीचा एकमेव व्यवसाय हा शेती व्यवसाय आहे असे दिसून येते. म्हणजेच प्रकल्पबाधीतांना जर त्यांच्या प्रकल्पबाधीत शेतजमिनीचा योग्य मोबदला मिहाला नाही तर त्यांच्या उदरनिर्वाहाचेच नुकसान संभवते.
२. प्रकल्पबाधीत बहुतांश तरूणवर्ग रोजगारासाठी शेती व्यवसायावरच निर्भर असल्याने कोणत्याही सार्वजनिक प्रकल्पाने अशा लोकांची कृशी जमिन बाधीत होणार असेल तर त्याचा मोबदला व पर्यायी जमिन अथवा पुनर्वसनाची व्यवस्था नीटपणे पार पाडणे आवश्यक आहे.
३. व्यापारी पीकक्षम शेती असल्यामुळे या भागातील शेतीची प्रती एकर किंमतही जास्त आहे. परिणामे प्रस्तुत प्रकल्पबाधीतांना त्यांच्या प्रकल्पबाधीत शेतीचा मोबदला देताना येथील सरकारी प्रचलित दर नव्हे तर बाजारभावानुसार विचार करूनच मोब

४. बहुतांश (९५.७४ टक्के) शेतकरी प्रकल्पाकरीता कोणत्याही दबावाव्यतिरिक्त आपले स्वत:चे उदरनिर्वाहाचे साधन असलेली कृषी जमिन देवून पायाभूत सुविधा प्रकल्प व एकंदरीतच आर्थिक विकास धोरणांस योगदान करत असतील तर त्यांच्या प्रकल्पबाधीत जमिनीस योग्य मोबदला मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

५. प्रकल्पबाधीतांना त्यांच्या प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्यात किती व कसा मोबदला मिळणार याची त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याकडून काहीही माहिती मिळालेली नाही. परंतु ऐकीव माहितीच्या आधारे त्यांनी आमच्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.

६. प्रकल्पबाघीत जमिनीचा किती मोबदला मिळणार आहे हे त्यांना माहित नसले तरीही त्यांना समाधानकारक मोबदला मिळणार नाही अशीच बहुतांश प्रकल्पबाधीतांची (६३.४१ टक्के) धारणा आहे. मिळणाऱ्या मोबदल्याविषयी अस्पष्टता असणाऱ्या प्रकल्पबाधीतांचे प्रमाणही (३१.७१ टक्के) चिंताजनकरित्या जास्त आहे.

७. एकूण प्रकल्पबाधीतांपैकी ९५.१२ टक्के (६३.४१ टक्के + ३१.७१ टक्के) प्रकल्पबाधीत आपल्या प्रकल्पबाधीत जमिनीकरीता मिळणाऱ्या मोबदल्याविषयी असमाधानकारक आहेत.

८. शेतकरीवर्गाने अनेक प्रकल्पांना जमिनी देवून प्रसंगी आपले उदरनिर्वाहाचे साधन गमावले आणि देशाच्या विकासकामात योगदान दिले. परंतु त्याच्या बदल्यात ना त्यांना योग्य मोबदला मिळाला ना त्यांचे वेळेवर योग्य पुनर्वसन झाले असाच इतिहास असल्याचे दिसून येते.

९. एकूणपैकी जास्तीत जास्त ८० टक्के प्रकल्पबाधीतांचा प्रस्तुत प्रकल्पास विरोध नाही. एकूणपैकी १५ टक्के प्रकल्पबाधीतांनी प्रकल्पविरोधी आंदोलन करून आपला विरोध दर्शविला असला तरी तो विरोध प्रामुख्याने प्रकल्पबाधीत

जमिनीच्या मोबदल्याशी निगडित आहे. त्यांचाही प्रकल्पाच्या कामास विरोध नाही असेच प्रत्यक्ष क्षेत्र पाहणीतून दिसून आले.

१०. आकडेवारीच्या विवरणावरून हे स्पष्टपणे जाणवते की एकूण सर्व १०० टक्के प्रकल्पबाधीतांचा प्रकल्पास अजिबात विरोध नसून प्रकल्पबाधीत जमिनीचा मोबदला व सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांच्या प्रकल्पबाधीतांप्रती असलेल्या वर्तणुकीस विरोध आहे असेच सापनि अभ्यासगटास क्षेत्र पाहणीच्या प्रत्यक्ष अनुभवावरून दिसून आले.

११. बहुतांशी प्रकल्पबाधीतांना (४६.६७ टक्के) त्यांच्या प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्यात जमिन हवी आहे. तर जवळजवळ तेवढ्याच (४२.२२ टक्के) प्रकल्पबाधीतांना बाजारभावापेक्षा अधिक दाराने त्यांच्या जमिनीचा मोबदला हवा आहे.

१२. काही प्रकल्पबाधीतांनी (४.४४ टक्के) कुटुंबातील किमान एका सदस्यास नोकरी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे तर २.२४ टक्के प्रकल्पबाधीतांना त्यांचे प्रकल्पबाधीत घर व जमिनीकरीता किमान बाजारभावाप्रमाणे किंमत मिळावी अशी अपेक्षा आहे.

१३. विशेष म्हणजे प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्पाचा बहुतांश भाग ऊस बागायतीचा व बारमाही पाणीपुरवठ्याचा असल्यामुळे या भागातील जमिनींच्या किंमती भरपूर आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या प्रक्लपबाधीत जमिनीस मोबदला देताना या बाबीचा विचार होणे आवश्यक आहे.

१४. प्रकल्पबाधन क्षेत्र बारमाही पाणीपुरवठ्याचे क्षेत्र असल्यामुळे नगदी पिकरचनेस भरपूर वाव आहे. त्यामुळे या भागातील शेतजमिनींचे बाजारभाव व सरकारी किंमत यात प्रचंड तफावत आहे. तसेच खरेदी-विक्री दस्त दर (डींरा र्ङ्गीं) खरेदी विक्रीच्या किंमतीवर आधारित असल्यामुळे प्रत्यक्ष खरेदी विक्री किंमत वास्तव सौदा अथवा व्यवहारापेक्षा कमी दाखवण्याची प्रवृत्ती असते.

१५. अर्थात जमिनीची बाजार किंमत ठरविताना ज्या दराने खरेदी विक्री व्यवहार झालेले असतात अशाच दरास कायदेशीर मान्यता व बाजार किंमत मानण्याचे धोरण असल्याने अशा दस्त बाजार किंमती जमिनींच्या वास्तव किंमतीपेक्षा कमीच असणार यात आश्चर्य नसावे. परंतु जेव्हा अशा भागातील जमिनी एखाद्या सरकारी प्रकल्पाकरीता अधिग्रहित केल्या जातात तेव्हा प्रकल्पबाधीत जमिनींचा मोबदला निश्चित करताना अलिकडच्या/नजिकच्या भूतकाळातील दस्त नोंदणीकृत किंमतींचा आधार घेतला जातो.

१६. उपरोल्लेख केल्याप्रमाणे दस्त नोंदणीच्या किंमती दस्त कर टाळण्याकरीता (Stamp Duty) कमी दर्शविलेल्या असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनीस सरकारकडून कमी मोबदला मिळण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे वास्तव बाजार किंमती जास्त व अधिग्रहण मोबदला कमी अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे मिळालेल्या मोबदल्यातून प्रकल्पग्रस्तांना नवीन जमिन खरेदी करणे शक्य होत नाही. त्यामुळे जे ४३.४८ टक्के प्रकल्पग्रस्त (तक्ता क्रमांक ५.३१) प्रकल्पबाधन मोबदल्यात नवीन जमिन खरेदी करू इच्छित नाहीत त्यापैकी ५० टक्के प्रकल्पग्रस्तांनी प्रक्ल्पबाधन मोबदला कमी व जमिनींचा वास्तव बाजारभाव जास्त या वास्तवाकडे अंगुलीनिर्देश केला आहे. त्यामुळे प्रकल्पबाधन क्षेत्रातील जमिनींचा वास्तव बाजारभाव शोधून त्याप्रमाणेच अधिग्रहण मोबदला देणे आवश्यक आहे. अर्थात काही प्रकल्पबाधीत शेतकरी (८.३३ टक्के) असेही आहेत की ज्यांना मिळालेला अधिग्रहण मोबदला मुलांचे शिक्षण व लग्नाकरीता (विशेषत: मुलींच्या) राखून ठेवणे आवश्यक वाटते.

१७. सार्वजनिक प्रकल्पबाधीतांचे पुनर्वसन करताना प्रकल्पबाधीतांच्या मुला-मुलींच्या पर्यायी रोजगाराचाही विचार होणे आवश्यक आहेच. असा विचार मात्र कोणतेही सरकारी प्रकल्प अंमलबजावणी खाते करताना दिसत नाही.

१८. प्रत्यक्ष क्षेत्रभेटीतून असेच दिसून आले की प्रकल्पाविषयी समाधानी व असमाधानी असे दोन्हीही गटातील शेतकरी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या

अधिकाऱ्यांबाबत मात्र असमाधानी असल्याचे निदर्शनास आले. याचे प्रमुख कारण असे की, प्रकल्प अधिकाऱ्यांकडून प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही अशी त्यांची प्रमुख तक्रार आहे. तसेच अधिग्रहित जमिन मोबदल्याविषयी या अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना विश्वासात घेवून काहीच माहिती दिली नाही अशी परिस्थिती निदर्शनास येते.

१९. जर एखाद्या प्रकल्पातील प्रकल्पबाधीतांना संबंधित प्रकल्पाचे लाभ आपोआप होणार नसतील तर मग सरकारने किंवा प्रकल्प विभागाने प्रतिगामी-अवगामी समावेशी प्रकल्पाच्या दिशेने विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. असे उदाहरण नवीन आंध्रप्रदेश सरकारने अमरावती येथे नवीन राज्य राजधानीकरीता जमिन अधिग्रहण करताना जी आदर्श निती वापरली त्याचे देता येवू शकेल.

२०. रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाच्या प्रकल्पोपरांत संभाव्य लाभांचा विचार केला तर जवळजवळ निम्मे (४८.९८ टक्के) प्रकल्पबाधीत अनभिज्ञ असल्याचे दिसून येते. अर्थात असा निष्कर्ष मिळणे काही आश्चर्य नाही. कारण प्रकल्प विभाग अधिकाऱ्यांनी प्रकल्पबाधीतांना प्रकल्पाविषयी अद्याप काहीच माहिती दिलेली नाही अथवा त्यांना विश्वासात घेतलेले नाही. दळणवळणाच्या सुविधा निर्माण होवून शेतीत नवीन तंत्र वापरता येईल असेही काही प्रकल्पबाधीतांना वाटते (१०.२० टक्के). परंतु याबाबतही त्यांना निश्चित अंदाज बांधता येत नाही असेच आम्हाला त्यांच्याबरोबर विशेष गटचर्चा करता लक्षात आले.

२१. प्रकल्पोपरांत रोजगार संधीचा विचार केला तर बहुतांश (८७.२३ टक्के) प्रकल्पबाधीत प्रस्तावित प्रकल्पामुळे रोजगार संधी निर्माण होणार नाहीत यावर ठाम आहेत.

२२. बहुतांश प्रकल्पबाधीतांना त्यांच्या जमिनीची वास्तव किंमत निश्चित करून त्याच्या चार पट मोबदला देणे आवश्यक आहे. अर्थात असे करताना नजिकच्या भूतकाळातील जमिन व्यवहारांच्या दस्त नोंदणी किंमतीचा आधार घेतला जावू नये. याची कारणमिमांसा आम्ही याअगोदर केलेलीच आहे.

## संदर्भसूची:


1. Burte, Himanshu (2014), The Smart City Card, Economic and Political Weekly, Vol. XXXXIX, No. XXXXVI, PP. 23-25.
2. Cao, Guangzhong, Changchun Feng, Ran Tao (2008), Local Land Finance in China's Urban Expansion: Challenges and Solutions, Chinaand World Economy, 16(2), 19-30.
3. Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Neede for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, PP. 52-58.
4. Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Neede for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, PP. 52-58.
5. Dnanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Neede for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, PP. 52-58.
6. Dnanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Neede for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, PP. 52-58.
7. Dutta, Ayona (2015), New Urban Utopias of Post-Colonial India, Enterprenuerial Urbanization in Dholera Smart City, Gujarat, Dialogus in Geogrtaphy, Vol. V (I), pp. 03-22.
8. FAO (2009), Land Grab and Development Opportunities? Agricultural Investments and International Land Deals in Africa, FAO-IED-IFAD Report.
9. Ghatak, Maitreesh and Parikshit Ghosh (2011), The Land Acquisition Bill: A Critique and a Proposal, Economic and Political Weekly, October 8, 2011, Vol. XLVI, No. XXXXI.
10. GoI (2018), All India Rural Financial Inclusion Survey-2016-17, National Bank for Rural and Agriculturakl Development (NABARD), Mumbai.
11. Hatekar, N (2003), Farmers and Markets in Pre Colonial Deccan: The Plausibility of Economic Growth in Traditional Society, Post and Presenr, No. 178, PP. 116-147.
12. Jenkins, R L Kennedy and Mukhopadhyay (Eds) (2014), Power, Policy and Protest: The Politics of India's Special Economic Zones, New Delhi, Oxford University Press.
13. Jnaki Nair (2015), Indian Urbanism and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, Septeber 5, 2015, PP. 54-63.
14. Kakani, RK, T L Ranga Ran and Tigga and Nutan Singh (2008), Insights into Land Acquisition Experiences of Private Business in India, Working Paper 08-11, Jamshedpur, XLRI School of Business and Human Resources.
15. Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.
16. Ramaswamy Iyer (2007, Towards A Just Displacement and Rehabilation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.
17. Subramaniam C (1979), The New Strategy in Indian Agriculture: The First Decade and After, New Delhi, Vikas Publishing House.

18. Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Towards A Just Displacement and Rehabilation Policy, Economic and Political Weekly, March 20, 2004, PP. 1191.

**परिशिष्टः १**

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अर्थशास्त्र अधिविभाग

## रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवालः २०१९

## प्रकल्प बाधीत कुटुंब प्रश्नावली

१. प्रकल्पबाधीत व्यक्तीचे नांव : -------------------------------

२. संपर्क क्रमांक : ----------------------------------------

३. गाव ---------- ४. : पोस्ट : -------- ५. तालुका : --------

६. जिल्हा : ----------- ७. धर्म : ---------- ८. जात : ------

९. कौटुंबिक माहिती :

| अ. क्र. | नांव | लिंग | शिक्षण | वय | व्यवसाय | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |
| ८ | | | | | | |

१०. आपण अथवा कुटुंबातील कोणी खालीलपैकी एखाद्या संस्थेचे सदस्य आहात काय? किंवा पूर्वी होतात काय?

| अ. क्र. | संस्था | व्यक्तीचे नांव |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | |
| २ | पंचायत समिती | |
| ३ | वि. का. सोसायटी | |

| | | |
|---|---|---|
| ४ | ग्राम विकास मंडळ | |
| ५ | जंगल कामगार संस्था | |
| ६ | सहकारी बँक | |
| ७ | बचत गट | |
| ८ | दूध संस्था | |
| ९ | बाजार समिती | |
| १० | भजनी मंडळ | |
| ११ | जात पंचायत | |
| १२ | तरूण मंडळ | |
| १३ | महिला मंडळ | |
| १४ | अन्य | |

११. शिधापत्रिका आहे काय? १) होय २) नाही

१) पांढरे २) पिवळे ३) केशरी

१२. स्वत:चे घर आहे काय? १) होय २) नाही

१३. घर कोणत्या प्रकारचे आहे? १) पक्के २) छपराचे ३) स्लॅब

१४. घर किती खोल्यांचे आहे? -------------

१५. कुटुंबात कोणी नोकरीत आहे का? १) होय २) नाही

१६. कोणत्या नोकरीत आहे? -------------

१७. नोकरीचे ठिकाण कोणते? -------------

१८. तुमच्या घराची एकूण जागा किती गुंठे आहे? -------------

१९. जनावरांच्या गोठ्याची जागा किती आहे? -------------

२०. घरगुती टिकावू वस्तूंचे विवरण :

| **वस्तू** | **संख्या** |
|---|---|
| टी. व्ही. | |
| फ्रीज | |

| | |
|---|---|
| वॉशिंग मशिन | |
| पंखे | |
| रेडिओ | |
| गॅस जोडणी | |
| सायकल | |
| मोटार सायकल | |
| चारचाकी | |
| मोबाईल | |
| | |
| | |

## विभाग – ब – मालकीच्या व ताब्यातील जमिनीचा तपशील

२१. जमिन १) होय २) नाही

| **जमिनीचा प्रकार** | **जिरायत** | **बागायत** | **पडिक** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| एकर | | | | |

२२. जमिनीचा तपशील द्या.

| **अ. क्र.** | **जमिन धारणा** | **एकर** | **गुंठे** | **जेथे जमिन आहे ते गाव** |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण जमिन धारणा | | | |
| २ | लागवडीखालील क्षेत्र | | | |
| ३ | लागवड योग्य पड जमिन | | | |
| ४ | जंगल व पडिक जमिन | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | खंडने घेतलेली जमिन | | | |
| ६ | खंडाने दिलेली जमिन | | | |
| ७ | सिंचनाखालील जमिन | | | |
| ८ | वनखात्याची अतिक्रमित | | | |

२३. शेतजमिनीचे घरापासून अंतर -------- मी.

२४. आपल्या आसपास सध्या शेतजमिनीचा एकरी दर काय आहे?

| **जमिनीचा प्रकार** | **एकरी दर रूपये** |
|---|---|
| मुरमाड | |
| मध्यम | |
| उत्तम | |
| बागाईत | |

२५. आपण जमिनीत कोणती पिके घेता त्याचे विवरण भरा.

| **अ. क्र.** | **खरीप पिके** | **एकर** | **अ. क्र.** | **रब्बी पिके** | **एकर** | **अ. क्र.** | **वार्षिक पिके** | **एकर** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | १ | | | १ | | |
| २ | | | २ | | | २ | | |
| ३ | | | ३ | | | ३ | | |
| ४ | | | ४ | | | ४ | | |
| ५ | | | ५ | | | ५ | | |

२६. पिकांचे एकरी उत्पादन सांगा.

| **अ. क्र.** | **खरीप पिके** | **एकरी उत्पादन (क्विंटल)** | **अ. क्र.** | **रब्बी पिके** | **एकरी उत्पादन (क्विंटल)** | **अ. क्र.** | **वार्षिक पिके** | **एकरी उत्पादन (क्विंटल)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | १ | | | १ | | |
| २ | | | २ | | | २ | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | | ३ | | | ३ | | |
| ४ | | | ४ | | | ४ | | |
| ५ | | | ५ | | | ५ | | |

२७. फळबाग लागवड आहे काय? १ होय २ नाही

२८. असल्यास किती एकरवर आहे? ------------

२९. फळपिकांचे विवरण घ्या?

| अ. क्र. | फळपिके | फळझाडांची संख्या |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |
| ७ | | |

३०. तुमच्या शेतामधील, बांधावर व पड जमिनीवरची वनसंपत्ती किती आहे?

| अ. क्र. | झाडांचा प्रकार | संख्या | झाडाचे नांव | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

३१. आपल्याकडे खालीलपैकी कोणती कृषी औजारे आहेत?

| **औजारे** | **होय/नाही** | **औजारे** | **होय/नाही** |
|---|---|---|---|
| पेरणी औजार | | बैलगाडी | |
| कुदळ | | नांगर | |
| लोखंडी नांगर | | कडबा कुट्टी | |
| फवारणी पंप | | | |
| डिझेल इंजिन | | | |
| वीजपंप | | | |
| कोळपे | | | |
| लाकडी नांगर | | | |
| मळणी यंत्र | | | |
| पॉवर टिलर | | | |
| ट्रॅक्टर | | | |

३२. शेतीसाठी पाण्याचे साधन कोणते आहे?

| | | |
|---|---|---|
| १ | ठिबक सिंचन | |
| २ | बोअरवेल | |
| ३ | विहीर | |
| ४ | पाटपाणी | |
| ५ | नदीचा पाट | |
| ६ | शेततळे | |
| ७ | पाझर तलाव | |
| ८ | कोल्हापूर बंधारा | |
| ९ | तुषार सिंचन | |

३३. विहिरीला पाणी किती फुटावर लागते? ---------------

३४. बोअरवेलला पाणी किती फुटावर मिळते? ---------------

३५. पाईपलाईन आहे का? १ होय २ नाही

३६. असल्यास लांबी सांगा. ------------- फूट

३७. प्राणी संपत्ती सांगा.

| **प्राणी** | **गाय** | **म्हैस** | **बैल** | **रेडा** | **कोंबड्या** | **शेळी** | **मेंढी** | **इतर** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | | | | | | | | |

३८. पशुधनापासून गेल्या वर्षभरातील उत्पन्न :

| **उत्पन्नाचा प्रकार** | **युनिट** | **उत्पादन** | **घरी वापरले** | **विकले** | **दर** |
|---|---|---|---|---|---|
| दूध | लिटर | | | | |
| अंडी | नग | | | | |
| लोकर | किलो | | | | |
| पशुविक्री | नग | | | | |
| अन्य | | | | | |

३९. इतर मार्गापासून उत्पन्न

| **अ. क्र.** | **बाब** | **उत्पन्न** |
|---|---|---|
| १ | नोकरी | |
| २ | व्यवसाय | |
| ३ | पेन्शन | |
| ४ | मुलांनी पाठविलेले | |
| ५ | जागा भाडे | |
| ६ | ट्रॅक्टर भाडे | |
| ७ | खंड | |
| ८ | अन्य | |

४०. घरामधील व्यक्तींची रोजगाराची साधने सांगा.

| अ. क्र. | रोजगार | स्त्री संख्या | पुरुष संख्या | आठवड्याचे दिवस | रोजचे उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वत:ची शेती | | | | |
| २ | शेतमजुरी | | | | |
| ३ | नोकरी | | | | |
| ४ | नरेगा रोजगार | | | | |
| ५ | | | | | |

४१. इतर रोजगार

| अ. क्र. | रोजगाराचा प्रकार | होय/नाही | रोजची मिळकत |
|---|---|---|---|
| १ | पिठाची गिरणी | | |
| २ | सायकल दुकान | | |
| ३ | किराणा दुकान | | |
| ४ | खानावळ | | |
| ५ | शिलाई मशिन | | |
| ६ | इतर | | |

४२. कर्ज व बचत विषयक तपशील

१. बँक खाते आहे का? १) होय २) नाही

२. बचत गट सदस्य आहात का? १) होय २) नाही

३. पोस्टात बचत खाते आहे का? १) होय २) नाही

४. पतसंस्थेत बचत खाते आहे का? १) होय २) नाही

५. सहकारी बँकेत बचत खाते आहे का? १) होय २) नाही

६. जीवन विमा आहे का? १) होय २) नाही

७. पशु विमा आहे का? १) होय २) नाही

८. पिक विमा आहे का? १) होय २) नाही

४३. कुटुंबाची दरमहा बचत किती आहे?     -------------- रूपये

४४. कर्जाचा तपशील सांगा. (संस्थात्मक)

| **कर्ज हेतू** | **कर्ज काढलेले वर्ष** | **रक्कम रू.** | **बँकेचे नांव** | **परतफेड केलेली रक्कम रू.** | **शिल्लक रक्कम रू.** |
|---|---|---|---|---|---|
| पिक कर्ज | | | | | |
| खावटी कर्ज | | | | | |
| विहीर | | | | | |
| बोअरवेल | | | | | |
| पाईपलाईन | | | | | |
| ट्रॅक्टर | | | | | |
| डिझेल इंजिन | | | | | |
| पंपसेट | | | | | |
| जमिनी दुरूस्ती | | | | | |
| गाय खरेदी | | | | | |
| म्हैस खरेदी | | | | | |
| जमिन खरेदी | | | | | |
| मालनी यंत्र घेणे | | | | | |
| घरबांधणी | | | | | |
| इतर | | | | | |

४५. खाजगी कर्जाचा तपशील सांगा.

| **अ. क्र.** | **कर्ज हेतू** | **वर्ष** | **रक्कम** | **दरमहा व्याज %** | **कोणाकडून घेतले** | **परतफेड केलेली रक्कम** | **शिल्लक रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लग्न | | | | | | |
| २ | आजार | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सण | | | | | | |
| ४ | औषध | | | | | | |
| ५ | बियाणे | | | | | | |

१) शेजारी २) नातेवाईकांकडून ३) सावकार ४) व्यापारी ५) मित्र ६) इतर

४६. धरणात तुमची कोणती मत्ता जाते?

| **मत्ता** | | **किती जाते** | **बाजार किंमत (अंदाजे)** |
|---|---|---|---|
| बागायत शेती एकर | | | |
| जिरायत शेती एकर | | | |
| पड जमिनी एकर | | | |
| स्लॅबचे घर | | | |
| कौलाचे/पत्र्याचे घर | | | |
| जुने मातीचे घर | | | |
| साधे छप्पराचे घर | | | |
| फळबाग प्रकार | १ | | |
| | २ | | |
| | ३ | | |
| | ४ | | |
| | ५ | | |
| | ६ | | |
| शेतीतील झाडे | प्रकार | | |
| | १ | | |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | २ | | |
| | ३ | | |
| | ४ | | |
| बांधावरील झाडे | प्रकार | | |
| | १ | | |
| | २ | | |
| | ३ | | |
| | ४ | | |
| पडिक जमिनीवरील झाडे | | | |
| विहीर | | | |
| बोअरवेल | | | |
| गोठा | | | |

४७. तुम्हाला जमिनीच्या मोबदल्यात काय मिळाले? १) जमिन २) रक्कम

४८. जमिनीचा एकरी किती मोबदला मिळाला? ----------- रू.

४९. एकूण किती रूपये मिळाले? ----------- रू.

५०. जमिनीच्या मोबदल्यात किती जमिन मिळाली? एकर

५१. आत्ताच्या जमिनीपासून किती अंतरावर मिळाली? कि.मी.

५२. जमिन कशा प्रकारची आहे?

| **अ. क्र.** | **जमिनीचा प्रकार** | **एकर** |
|---|---|---|
| १ | जिरायत | |
| २ | बागायत | |
| ३ | पडिक | |
| ४ | खडकाळ | |
| ५ | खाण बंद झालेली जमिन/डोंगर | |

५३. मिळालेल्या जमिनीच्या काय समस्या आहेत?

५४. मिळालेली जमिन याच धरणाच्या लाभक्षेत्रात आहे काय? १) होय  २) नाही

५५. तुमच्या घराच्या मोबदल्यात काय मिळाले?  १) रक्कम  २) घर/प्लॉट

५६. पैसे (रक्कम) किती मिळाली?  --------- रूपये

५७. मिळालेला प्लॉट आत्ताच्या घरापासून किती दूर आहे?

५८. या धरणाचा तुमच्या पर्यायी जमिनीला भविष्यात लाभ मिळणार काय?

१) होय  २) नाही

**प्रकल्प भूसंपादन विषयक**

५९. प्रकल्पासाठी जागा संपादणुकीमुळे काय स्वरूपाचे नुकसान होणार आहे?

| | **शेतजमिन** | **विहीर** | **बोअरवेल** | **शेतघर** | **जनावरांचा गोठा** | **फळबागा** | **इतर** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| घटक | | | | | | | |
| संख्या | | | | | | | |
| युनिट | एकर | नग | नग | नग | नग | एकर | |

६०. जमिन पुनर्वसन कामी द्यावी यासाठी तुमच्यावर कोणी दबाव आणला का?

१) होय  २) नाही

होय असल्यास कोणी?

१) तरूण पिढी  २) नातेवाईक  ३) गावकरी

४) शासकीय अधिकारी  ५) अन्य

६१. जमिनीस मिळणारी किंमत समाधानकारक वाटते का? १) होय  २) नाही

६२. आपण पुनर्वसन भूमि अधिग्रहणास विरोध कसा दर्शवलात?

विरोधी आंदोलन

जमिनीचे सौदे करताना ताठर भूमिका

समितीच्या माध्यमातून

न्यायालयात अपिल करून

विरोध नाही

६३. शासनाकडे तुमच्या प्रमुख मागण्या कोणत्या आहेत?

जमिनीच्या बदल्यात जमिन

बाजारभावापेक्षा जास्त दर

नव्या जागी गावाचे पुनर्वसन

प्रकल्पग्रस्तास नोकरी

जमिन व घराची किंमत बाजारभावाप्रमाणे

अन्य ----------------------------------------

६४. सदर प्रकल्पाचा तुम्हाला किंवा नातेवाईकांना फायदा होईल असे वाटते का?

१) होय २) नाही

६५. प्रकल्पामुळे खालीलपैकी कोणत्या गोष्टी होतील?

जमिनीला योग्य किंमत

रोजगार मिळेल

रोजगाराच्या संधी निर्माण होतील

सांगता येत नाही

६६. तुम्ही शेती व्यवसाय चालू ठेवू इच्छिता काय? १) होय २) नाही

होय असल्यास कारण

व्यवसायाचे ज्ञान आहे

परंपरेने चालत आला आहे

वाडवडिलांपासून हेच करत आलो आहे

अन्य ------------------------------

नाही असल्यास का?

तोट्यातला व्यवसाय

कष्टाचे काम

तरूण पिढीचे दुर्लक्ष

समाजात किंमत नाही

अन्य -------------------------------

६७. प्रकल्पाकडून जमिनीचा मोबदला मिळाल्यावर त्यातून नवीन जमिन खरेदी कराल का? १) होय २) नाही

होय असल्यास कारण

शेती हाच व्यवसाय करणार

जमिन खरेदी फायदेशीर असते

जमिन खरेदी कोठे कराल

सध्याच्या गावापासूनचे अंतर

उत्तर नाही असल्यास कारण

पुन्हा शेतीकडे वळणार नाही

मिळालेल्या रक्कमेपेक्षा जमिनीची किंमत जास्त

मुलांच्या शिक्षण व लग्नासाठी रक्कम राखून ठेवणार

मजुरी करणार

६८. नव्याने खरेदी करावयाची जमिन घरापासून किती अंतर आहे? --- कि.मी.

६९. प्रकल्पाकडून मिळालेल्या पैशातून तेवढीच जमिन किंवा त्याहून अधिक जमिन विकत घेणे शक्य होईल काय?

१) तेवढीच जमिन २) त्याहून जास्त

३) त्याहून कमी ४) सांगता येत नाही

७०. प्रकल्पाच्या कामकाजाबाबत तुम्ही समाधानी आहात काय?

१) होय २) नाही

७१. प्रकल्पामुळे या भागात रोजगाराच्या संधी निर्माण होतील असे वाटते का?

१) नाही २) थेट रोजगार

३) प्रत्यक्ष रोजगार ४) सांगता येत नाही

७२. प्रकल्पाचे खालीलपैकी कोणते परिणाम होतील?

| | |
|---|---|
| गरीबांकडे पैसा जाईल | श्रीमंत अधिक श्रीमंत होतील |
| सामाजिक नातेसंबंध सुधारतील | गटबाजी निर्माण होईल |
| शेतीतील नवी तंत्रे वापरता येतील | शेती करण्याच्या जुन्या पद्धती मोडून पडतील |

७३. आपल्या कुटुंबातून कोणी प्रकल्पाच्या कामावर मजुरीसाठी जाऊ इच्छिते का?

१) होय २) नाही

होय असल्यास संख्या : स्त्री: पुरुष :

मुलाखत देणाऱ्याचे नांव : ------------------------ सही

मुलाखत घेणाऱ्याचे नांव : ------------------------सही

ठिकाण :

दिनांक :

## परिशिष्ट: २

## रूकडी रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम निर्धारण अहवालकामी सर्वेक्षीत प्रकल्प बाधीत कुटुंब यादी

| Sr.No. | Name of the Surveyed Project Affected Farmer |
|---|---|
| 1 | Raovsaheb Mohite |
| 2 | Krishna shivappa Ambi |
| 3 | Babaso Appa Gavane |
| 4 | kulgonda A. patil |
| 5 | Shamrao Anna Patil |
| 6 | Anna Dada Patil |
| 7 | Shivgonda A Patil |
| 8 | Kallapa Nemu lokare |
| 9 | Abutalib D Mujawar |
| 10 | Mahavir D Patil |
| 11 | Adinath A. Magdum |
| 12 | Prakash N. magdum |
| 13 | Shantinath A. Magdum |
| 14 | Babaso A Magdum |
| 15 | Sudam A magdum |
| 16 | Prabhunkumar S Patil |
| 17 | Rajgonda J. Patil |
| 18 | Babgonda R Patil |
| 19 | Sharad J. Patil |
| 20 | Anil A Patil |
| 21 | Nemgonda A Patil |
| 22 | Anu M. Patil |
| 23 | Rajgonda J. Patil |
| 24 | Rajgonda B. Patil |
| 25 | Babaso K. Patil |
| 26 | Padgonda A. Patil |
| 27 | Bhavuso (Subhash) S. Patil |
| 28 | Rajgonda A. Sankana |
| 29 | Arihant N. Patil |

| | |
|---|---|
| 30 | Shantabai A.Patil |
| 31 | Babgonda J. Patil |
| 32 | Shrikant J. Koge |
| 33 | Kuber Shamrao Lokare |
| 34 | Vasant Kushappa Kambale |
| 35 | Sudam Parasu Mane |
| 36 | Sitabai Bapu Kamble. |
| 37 | Rukmini B. Kamble |
| 38 | Kalidas S. Chinchwadkar |
| 39 | Kallappa A. Kamble |
| 40 | Datta Devu Kamble |
| 41 | Vasant A. Kamble |
| 42 | Dattu Bhavu Kamble |
| 43 | Maruti I Kamble |
| 44 | Shankar Piraji Kamble |
| 45 | Bhavu R. Kamble |
| 46 | Ajit Bapu Kamble |
| 47 | Vilas A. Kamble |
| 48 | Ashok J. Kamble |
| 49 | Bhaskar B. Kamble |
| 50 | Adagonda N. Patil |
| 51 | Sunil R. Kamble |
| 52 | Bandu A. Kamble |
| 53 | Mangal M. Kamble |